सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २ जानेवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक २६६ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## थोडक्यात...

### भीमा कोरेगावमध्ये शौर्य दिवस

**भीमा कोरेगाव :** हा दरवर्षी १ जानेवारी रोजी साजरा केला जातो, जो १८१८ मध्ये झालेल्या ऐतिहासिक लढाईची आठवण म्हणून साजरा होतो, जिथे ५०० महार सैनिकांनी पेशव्यांच्या मोठ्या सैन्याचा पराभव केला होता, आणि या दिवशी विजयस्तंभाला मानवंदना देण्यासाठी हजारो लोक जमतात, ज्यात मोठा पोलीस बंदोबस्त असतो. उद्या, १ जानेवारी २०२६ रोजी २०८ वा शौर्य दिवस साजरा होत आहे. या निमित्ताने मोठ्या उत्साहात अभिवादन सभा आयोजित केल्या जात आहेत. ज्यात दलित अस्मिता आणि शौर्याचा उत्सव साजरा होतो.

### भरधाव इनोव्हानं तिघांना चिरडलं

**कोल्हापूर :** पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर कोल्हापुरातील तावडे हॉटेल परिसरात (१ जानेवारी) नववर्षाच्या सुरुवातीलाच पहाटेच्या सुमारास भीषण अपघात घडला. भरधाव वेगात असलेल्या इनोव्हा कारने रस्त्याकडेला उभ्या असलेल्या तिघांना जोरदार धडक दिल्याने तिघांचाही जागीच मृत्यू झाला. ही घटना पहाटे सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास घडली.

# ‘रणांगणा’त भाजपच्या तोफा धडाडणार

**मुंबई :** मुंबईसह राज्यातील महत्त्वाच्या महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी भाजपने आक्रमक प्रचाराची रणनीती आखली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभांचा धडाका लागणार आहेत. तर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याही तोफा धडाडणार



आहेत. तर, पंतप्रधान मोदी यांची सभा होणार नसली तरी एका कार्यक्रमानिमित्त मुंबई येणार आहेत. त्या माध्यमातून पंतप्रधान मोदी आपल्या भाषणातून सूचक संदेश मतदारांना देणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात ४० ते ४५ प्रचारसभांचे नियोजन करण्यात आले असून, मुंबई महानगर क्षेत्रातील पालिकांसाठी ११, १२ आणि १३ जानेवारी रोजी देशभरातील स्टार प्रचारकांची फौज उतरवण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रचार मोहिमेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह भाजपशासित राज्यांतील मुख्यमंत्री आणि नामवंत प्रचारक सहभागी होणार आहेत. मुंबई महानगर क्षेत्रात मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली या प्रमुख शहरांवर भाजपचा विशेष भर राहणार आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी ११ जानेवारी रोजी मुंबईत दाखल होणार आहे. त्यांच्या हस्ते ‘पद्मभूषण’ पुरस्कारप्राप्त आचार्य श्री रत्नसुंदरसुरीश्वरजी महाराज यांनी लिहिलेल्या ५०० व्या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून जैन समाजातील मतदारांपर्यंत सकारात्मक संदेश पोहोचवण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याचे सांगितले जात आहे.

मुंबईतील मोठ्या प्रमाणावरील उत्तर भारतीय मतदारांचा विचार करता, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह भोजपुरी चित्रपटसृष्टीतील अभिनेते मनोज तिवारी, रवी किशन, गायक निरहुआ आणि मैथिली ठाकूर यांनाही प्रचारासाठी पाचारण करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आगामी दहा दिवसांत तब्बल ४० ते ४५ प्रचारसभा घेणार आहेत. दिवसाला सरासरी चार सभा घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे भाजपच्या प्रचाराला मोठा वेग मिळणार आहे.



**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ‘दिवंगत आमदार लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप शक्तिस्थळा’चे लोकार्पण व कोनशिला अनावरण. यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# चिन्मय मिशनच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त ‘चिन्मय अमृत यात्रा’चे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** चिन्मय मिशनच्या ७५ वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त प.पू. स्वामी चिन्मयानंदजी यांच्या जीवनकार्यावर आधारित ‘चिन्मय अमृत यात्रा (गीता सार)’ या विशेष आध्यात्मिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत स्वामीजींच्या जीवनाचे चित्रमय दर्शन, केरळहून आलेल्या पादुकांचे पूजन तसेच प्रेरणादायी प्रवचनाचा लाभ भाविकांना घेता येणार आहे.

हा कार्यक्रम ३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत श्री समर्थ राम मंदिर, श्री वरद गणेश मंदिराच्या बाजूला, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे.

या सोहळ्यासाठी संजयअप्पाजी बारगजे, प्रमुख – नैतिक मूल्य शिक्षण योजना, महाराष्ट्र व गोवा राज्य, विश्व हिंदू परिषद हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

चिन्मय मिशन, छत्रपती संभाजीनगर तसेच श्री समर्थ राम मंदिर, समर्थनगर यांच्या कार्यकारिणी व विश्वस्त मंडळाच्या वतीने भाविक, नागरिक व साधकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक आणि मूल्याधिष्ठित उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जुन्या-नव्यांची सांगड घालून जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा रोवणार : चंद्रशेखर बावनकुळे

**तभा वृत्तसेवा**

**हिंगोली, १ जानेवारी :** माजी आमदार प्रज्ञाताई सातव यांच्यासह कार्यकर्त्यांच्या



भाजप प्रवेशामुळे पक्षाची ताकद वाढली असून, जुन्या- नव्यांची सांगड घालून आगामी जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा रोवणार आहे, अशी ग्वाही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

काही दिवसांपूर्वी मुंबई येथे काँग्रेसच्या प्रज्ञाताई सातव यांनी कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. याबद्दल हिंगोलीत १ जानेवारी रोजी त्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. याप्रसंगी बावनकुळे बोलत होते. याप्रसंगी राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, आमदार तान्हाजी मुटकुळे, भाजप जिल्हाध्यक्ष गजानन घुगे, माजी आमदार रामराव वडकुते, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजी शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शिवदास बोड्डेवार, उज्ज्वलाताई तांभाळे, दिलीप देसाई, सुरजीतसिंह ठाकूर, उमेश नागरे, रमेश बगडिया, रजनीश पुरोहित, संजय कावडे, भागवत चव्हाण, पप्पू चव्हाण, विलास गोरे, रवि गोरेगावकर आदींची उपस्थिती होत. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रज्ञा सातव यांचा सत्कार करण्यात आला.

बावनकुळे म्हणाले, दिवंगत खासदार राजीव सातव यांनी या भागाच्या विकासाचे स्वप्न पाहिले. त्यामुळे या भागाचा विकास करण्यासाठी प्रज्ञाताई सातव यांना पक्षाकडून ताकद दिली जाईल.

नवीन कार्यकर्त्यांना पक्षात सामावून घेऊ. आगामी निवडणुकीत जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांची सांगड घालून एकत्रितरित्या काम करुन जिल्हा परिषदेवर झेंडा फडविण्याचा विश्र्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या, सातव घराण्याशी माझा जुना स्नेह आहे. या जिल्ह्याची संपर्कमंत्री म्हणून प्रज्ञाताई सातव यांना जी काही मदत लागेल ती केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमास भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अपघात रोखण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन आवश्यक

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** प्रत्येक व्यक्तीचा जीव मौल्यवान असतो, मात्र वाहतूक नियमांचे पालन न केल्याने आपण आपला आणि इतरांचाही जीव धोक्यात टाकतो. देशात जवळपास एक ते दीड लाख व्यक्तींचा दरवर्षी अपघातात मृत्यू होतो, यामध्ये सुमारे दहा ते अकरा टक्के मृत्यू आपल्या राज्यात होतात. हे मृत्यू टाळण्यासाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करण्याची गरज आहे. विशेषतः युवा वर्गाने यासाठी पुढाकार घ्यायला हवा, युवक-युवतींनी वाहतूक नियमांचे पालन करून इतरांनाही त्याबाबत जागरूक करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. लातूर जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, परिवहन विभाग व पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२६ चे उद्घाटन जिल्हाधिकारी कार्यालय येथील नियोजन समिती सभागृहात जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते झाले. जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, अश्वजीत जानराव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, आशिषकुमार अय्यर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



# भरधाव वेगात येणाऱ्या कारने घेतला तरुणीचा बळी

## लातूरच्या नाईक चौकातील दुर्दैवी घटना । संतप्त नातेवाईक-नागरिकांचा रस्ता रोको

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** लातूर शहरातील वसंतराव नाईक चौकात दि. ३१ डिसेंबरच्या रात्री साडे अकरा वाजता भरधाव वेगात येणाऱ्या कारने एका दुचाकीला दिलेल्या भीषण धडकेत एका २४ वर्षीय तरुणीचा बळी गेल्याची घटना घडली. तरुणीच्या मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात आल्यानंतर मृतदेह घरी नेत असताना रुग्णवाहिका थांबवून संतप्त नातेवाईकांनी रस्ता रोको आंदोलन करून आरोपींच्या अटकेची मागणी केली. रास्ता रोको आंदोलनामुळे काही काळ या महार्गावरील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती.

लातूरच्या एलआयसी कॉलनी, इंद्रायणी नगरमध्ये राहणारी कु. प्रतिक्षा ताराचंद राठोड ही दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी रात्री साधारणतः साडे अकराच्या सुमारास आजारी असलेल्या आपल्या आईला रुग्णालयात डबा देऊन



दुचाकीवरून घरी परतत होती. त्यावेळी वसंतराव नाईक चौकात महात्मा बसवेश्र्वर चौकाकडून भरधाव वेगात येणाऱ्या स्विफ्ट कार क्रमांक एमएच ४३ एएफ १०५५ च्या चालकाने दुचाकीला जोराची धडक दिली.

ही धडक एवढी भीषण होती की, सदर तरुणी दुचाकीवरून फेकली जाऊन गंभीर जखमी होऊन मरण पावली. तिच्या सोबत असणारी कु. शिवानी अमोल जाधव वय ४ वर्ष ही जखमी झाली. सदर अपघात होताच घाबरलेल्या कार चालकाने कार अपघातस्थळी सोडून पळ काढला. कारमध्ये चालकांसह एकूण चार जण असल्याचे सांगण्यात आले. कारमध्ये दारूच्या बाटल्यांचे बॉक्स असल्याचे आढळून आले आहे.

या तरुणीच्या अपघाती निधनाचे वृत्त समजताच एलआयसी कॉलनी, इंद्रायणी नगर परिसरात एकच खळबळ उडाली. सदर तरुणी अतिशय मनमिळावू स्वभावाची असल्याने तिच्या दुर्दैवी मृत्यूबद्दल परिसरातील सर्वच नागरिकांनी हळहळ व्यक्त केली. तरुणीचा मृतदेह शव विच्छेदनानंतर आणला जात असताना गुरुवारी दुपारी नातेवाईकांनी नाईक चौकात जोरदार निदर्शने करून रास्ता रोको आंदोलन केले. त्यावेळी मोठ्या प्रमाणात नागरिकांच्या भावनांचा उद्रेक झाला. मात्र, विवेकानंद चौक पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकारी -कर्मचाऱ्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. या रास्ता रोको आंदोलनात माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, विवेक साळुंके, राठोड यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. यावेळी चंद्रकांत बिराजदार यांनी नाईक चौकात गतिरोधक निर्माण करण्याची मागणी मागच्या अनेक वर्षांपासून केली जात असून प्रशासन या मागणीकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याचा आरोप केला. नाईक चौकात नेहमीच अशा प्रकारचे छोटे मोठे अपघात घडत असून अनेक निष्पाप लोकांचे बळी जात आहेत.

कु. प्रतिक्षा राठोड हिच्या अपघाती मृत्यूने नाईक चौकातील गतिरोधक आणि सिग्नलचा विषय पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात करण गंगाराम राठोड यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मुळे करत आहेत.



# रोटरी आधार रुग्णसेवा केंद्राला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर भेट

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** लातूर शहरातील रुग्णांच्या विविध गरजा पुरविण्यासाठी रोटरी आधार रुग्ण सेवा केंद्राची निर्मिती नुकतीच करण्यात आली आहे. या केंद्राद्वारे रुग्ण, नातेवाईक आणि कुटुंबीयांना उपचारानंतरच्या आरोग्य विषयक वस्तू व साधने मोफत आणि अल्प दरामध्ये उपलब्ध करून दिल्या जातात. तसेच आरोग्य सेवा सुद्धा रुग्णांना पुरविण्यात येते. आधार रुग्ण सेवा केंद्रामध्ये सर्व पदाधिकारी हे रोटरी क्लबचे सर्व सदस्य आहेत. अशा या अत्यंत महत्त्वपूर्ण केंद्राला नुकतेच रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांनी ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर डोनेट केले आहे.

यावेळी कॉपच्या अध्यक्ष डॉ. मायाताई कुलकर्णी आणि सचिव तथा रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनचे अध्यक्ष रो. डॉ. गुणवंत बिरादार, रो. माधव पांडे आणि रो. विश्र्वनाथ स्वामी (सावळे) यांचे कुटुंबीय यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांनी रोटरी आधार रुग्णसेवा केंद्राला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटरची भेट देऊन भविष्यातही आवश्यक असणाऱ्या बाबी डोनेट करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

यावेळी डॉ. मायाताई कुलकर्णी यांनी आणि रो. डॉ. गुणवंत बिरादार यांनी रो. विश्वनाथ स्वामी (सावळे) यांचे अभिनंदन करून त्यांनी दिलेल्या डोनेशन बद्दल समाधान व्यक्त केले तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनी या केंद्राला अर्थसाह्य करावे असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

# लातूर शहरातील अनेक मुस्लीम बांधवाचा भाजपात प्रवेश



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** लातूरसह देशामध्ये पंतप्रधान मोदींनी मुस्लिम समाजाला विविध योजना लागू केल्याचे कार्य केले. हज, मक्का, मदिना आदी धार्मिक स्थळांना जाण्यासाठी लागणाऱ्या तिकीटावर लावलेला १८ टक्के जीएसटी रद्द करून ५ टक्क्यावर आणण्याचे कार्य केलेले आहे. मरशांना शासकीय ग्रँट दिले. कर्नाटक, काश्मीर व इतर मुस्लीम अभ्यासकांना पद्श्री अवार्ड देऊन त्यांचा सन्मान केला. त्यामुळे आम्ही भाजपामध्ये प्रवेश करीत आहोत. त्यामुळे लातूर महानगरपालिका प्रचंड मताधिक्याने विजयी होणार असल्याची प्रतिक्रियाही व्यापारी इम्रान बागवान व इरशाद बागवान यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

सर्वांना समान न्याय देऊन देशात आणि राज्यामध्ये एकोपा ठेवण्याचे काम भारतीय जनता पार्टीने केलेले आहे. त्यामुळे भाजपा नेते, माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व आदिती पाटील कव्हेकर, रंजित पाटील कव्हेकर, विश्वजीत पाटील कव्हेकर यांच्या कार्यावर विश्वास ठेवून पटेल नगर भागातील शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये जाहीर प्रवेश करण्यात आला. यावेळी पटेल नगर भागातील गणी बागवान, विश्वंभर घार, इम्रान बागवान, इरसाद बागवान, जुनीद बागवान, समीर बागवान, कैफ बागवान, मुन्ना बागवान यांच्यासह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात भाषा समन्वय मंडळाची स्थापना

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** लातूरपासून जवळच असलेल्या बाभळगाव येथील दयानंद शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांचा समन्वय साधण्यासाठी भाषा समन्वय मंडळाची स्थापना केली आहे.

विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्य, अभिव्यक्ती क्षमता व बहुभाषिक संवाद वाढविण्याच्या उद्देशाने सदर मंडळ कार्य्र करणार आहे. नव्यानेच स्थापन करण्यात आलेल्या या मंडळाच्या अध्यक्षपदी ऋषिकेश सुरवसे यांची तर सचिवपदी अपेक्षा मस्के यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी सना महेबूब शेख, सहसचिव सोनम सगर, प्रसिद्धी प्रमुख ऐश्वर्या भोसले, सदस्य पूजा सुनील सगरे, कविता कांबळे, यश कांबळे यांची निवड केली गेली आहे. कार्यकारिणीत विद्यार्थी प्रतिनिधी व इतर सदस्यांचीही निवड केली आहे. भाषा समन्वय मंडळाच्या माध्यमातून वक्तृत्व स्पर्धा, वाचन उपक्रम, निबंध लेखन, भाषांतर कार्यशाळा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

भाषा समन्वय मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे प्राचार्य डॉ. दुश्यंत कटारे, भाषा समन्वय प्रभारी प्रा. डॉ. अजित भांजी, प्रा. डॉ. एम.एन. गायकवाड, प्रा.डॉ. नानाजाधव, प्रा. डॉ. इंद्रजित शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे.

## 'कमला नेहरू'मध्ये गणित दिन साजरा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** लातूर तालुक्यातील बोरी येथील कमला नेहरू विद्यालयात जागतिक कीर्तीचे गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जयंती दिन गणित दिन म्हणून साजरा करण्यात आला.

या छोटेखानी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ए.जी. पटेल हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून आर. एस. शिंगडे, जी.जी. रातोळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डी. व्ही. कराड यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी या उपक्रमाच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. शेख अब्दुल, शिंगडे , रातोळे यांनीही गणिताचे महत्व विशद केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बी.के. शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन व्ही. आर. मोरे यांनी केले.

# 'गांजा तपासणी'च्या बहाण्याने रक्कम चोरणारा आरोपी गजाआड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** तब्बल २० वर्षांपूर्वी 'गांजा तपासणी'च्या बहाण्याने खिशातील रक्कम चोरणारा आरोपीला अखेर गजाआड करण्यास पोलीस पथकाला यश आले आहे. लातूर पोलिसांच्या विशेष पथकाची या उल्लेखनिय कामगिरीचे कौतुक होत आहे.

लातूर शहरातील गांधी चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीत २० वर्षांपूर्वी हा गुन्हा घडला होता. या गुन्ह्यातील आरोपी नामे राजेंद्र ऊर्फ राजू निवृत्ती बनसोडे (वय ५४ वर्षे), रा. प्रकाशनगर, लातूर, सध्या रा. विकासनगर, लातूर हा गेल्या २० वर्षांपासून फरार होता. फिर्यादी सोमनाथ शामराव मुळे, रा. तेर, ता. जि. उस्मानाबाद हे दि. २५ फेब्रुवारी २००५ रोजी तेरणा इंजिनिअरिंग महाविद्यालयात बी.ई. (आयटी) फायनल इयरचे शिक्षण घेत असताना, मोटार खरेदीसाठी लागणाऱ्या सबमर्सिबल मोटारीचे साहित्य खरेदी करण्यासाठी लातूर येथे आले



होते. त्यांनी सोबत दहा हजार रुपये आणले होते. खरेदी केल्यानंतर उरलेली रक्कम व दुकानांच्या पावत्या त्यांनी पॅन्टच्या खिशात ठेवलेल्या होत्या.

रात्री अंदाजे आठ वाजण्याच्या सुमारास, मध्यवर्ती बसस्थानक, लातूर येथे एस.टी.डी. कॉईन बॉक्सवरून फोन करून बाजूला जात असताना, दोन अनोळखी इसम त्यांच्याजवळ आले व तुझ्या खिशात गांजा आहे, तपासणी करू दे असे सांगून, फिर्यादीच्या पॅन्टच्या खिशातील साडेचारशे रुपये व खरेदीच्या पावत्या जबरदस्तीने काढून घेतल्या.

फिर्यादीने आरडाओरड करताच बसस्थानकावरील पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून एका आरोपीस पकडले व त्याच्याकडून साडेचारशे रुपये व पावत्या जप्त केल्या. त्यावरून पोलीस स्टेशन गांधी चौक येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

अपर पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकास गोपनीय माहिती प्राप्त झाली की, सदर आरोपी सध्या विकासनगर, लातूर येथे वास्तव्य करत आहे. ही माहिती तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात आली. त्यानंतर विशेष पथकाने नियोजनपूर्वक

### लातूर पोलिसांच्या विशेष पथकाची उल्लेखनिय कामगिरी

कारवाई करत, आरोपी राजेंद्र ऊर्फ राजू निवृत्ती बनसोडे यास त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर पोलिसांच्या विशेष पथकातील सपोनि शिवशंकर मनाळे, पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अमलदार दत्तात्रय शिंदे, योगेश गायकवाड, श्रीकांत कुंभार यांनी सदर उल्लेखनीय कामगिरी बजावली.

# लातुरात दृष्टी दिव्यांग व्यक्तींसाठी ब्रेल महोत्सवाचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १ जानेवारी :** बियांड व्हिजन फाउंडेशन, रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२, नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, लातूर शाखा, अंधजन विकास मंडळ, लातूर यांच्यावतीने दि. ०४ जानेवारी विश्र्व ब्रेल दिनाचे औचित्य साधून दि. २ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये बालाजी मंदिर, मंगल कार्यालय, पाप विनाश रोड, लातूर येथे दृष्टी दिव्यांगांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी ब्रेल महोत्सव २०२६चे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात राज्यातील विविध जिल्ह्यातून दोनशेहून अधिक दृष्टी दिव्यांग व्यक्ती सहभागी होणार आहेत. या महोत्सवात दि. ०२ जानेवारी २०२६ रोजी राज्यस्तरीय ऑनलाईन ब्रेल वाचन स्पर्धेचे आयोजन केले आहे.

दि. ३ जानेवारी २०२६ रोजी कनिष्ठ व वरिष्ठ अशा दोन गटात राज्यस्तरीय सुगम संगीत स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ स. १० वाजता श्रीमती तृप्तीताई अंधारे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद लातूर, डॉ. विजयभाऊ राठी, अध्यक्ष, नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, लातूर शाखा तथा माजी प्रांतपाल रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२, डॉ. संजय गवई, प्रोफेसर, समाजकार्य विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

# भादा जि.प. कन्या शाळेसह विविध कामांना मंजुरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या दुमजली नवीन वर्ग खोल्या बांधकामास ९० लाखाचा निधी मंजूर केल्याबद्दल तसेच गावांतर्गत विविध कामे मंजूर केल्याबद्दल भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून भादा येथील ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील वर्षानुवर्षे विकास कामापासून कोसो दूर असलेल्या औसा तालुक्यातील




मौजे भादा येथील रस्त्यांच्या विविध कामाबरोबरच शासनाच्या विविध योजनेतून गावांतर्गत अनेक विकास कामे मोठ्या प्रमाणात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झाली. या सर्व कामांना लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आणि भादा गावच्या विकासाला गती दिली.

परवाच जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या माध्यमातून मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला या शाळेच्या जुन्या वर्ग खोल्या पाडून त्याच जागेवर दोन मजली नवीन सहा वर्ग खोल्या

### भादा ग्रामस्थांच्या वतीने आ. कराडांचे आभार व्यक्त

बांधणे, ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वच्छतागृह, विद्युतीकरण यासह इतर नव्याने बांधकाम करण्यात यावे यासाठी ९० लक्ष रुपयाचा निधी मंजूर केल्याबद्दल आ. रमेशआप्पा कराड यांचा भादा ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सत्कार करून आभार व्यक्त केले आहे.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, प्रदेश भाजपाचे भागवत सोट, पद्माकर चिंचोलकर, मंडलाध्यक्ष उद्धव काळे, बालाजी शिंदे, रेवण पाटील, योगेश लटूरे, दीपक शिवलकर, प्रेम लटुरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. आ. कराड यांनी यावेळी उपस्थित भादा ग्रामस्था समवेत गावातील आणि परिसरातील विविध विकास कामाच्या अनुषंगाने चर्चा केली.

## प्रा. अर्चना शिंदे यांना पीएच.डी. प्रदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** येथील दयानंद कनिष्ठ वाणिज्य महाविद्यालयातील इंग्रजी विषयाच्या प्रा. अर्चना शिंदे - गुंजाळ यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने इंग्रजी विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

प्रा. डॉ. शिंदे यांनी अत्यंत सखोल, सूक्ष्म अभ्यास करून प्रा. डॉ. अनिल कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली 'वुमन सबज्युगेशन अँड अमॅन्सिपेशन इन द सिलेक्ट वर्क ऑफ बुची इमेचेटा : अ स्टडी' या विषयावर शोध प्रबंध सादर केला होता.

पीएच.डी. प्रदान करण्यात आल्याबद्दल अणे मार्गदर्शक डॉ. अनिल कट्टे, डॉ. पांडुरंग शितोळे, डॉ. मुस्तजीब खान, डॉ. रमेश चौगुले, डॉ. समाधान पवार, प्राचार्य बाबासाहेब गुंजाळ,सतीश पवार, रणधीर निंबाळकर यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



# ऋषिकेश कराडांकडून शिंदे परिवाराचे सांत्वन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ३० डिसेंबर :** लातूर तालुक्यातील मौजे बोकनगाव येथील हभप निवृत्ती महाराज शिंदे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने नागेश दादाराव शिंदे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. सदरील निधनाचे वृत्त समजल्याने भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांनी बोकनगाव येथे जाऊन दोन्ही शिंदे कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.

भाजपाचे युवा नेते ऋषिकेश कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे बोकनगाव येथे मंगळवारी शिंदे कुटुंबीयांची भेट घेतली. याप्रसंगी शिंदे कुटुंबियातील स्व. निवृत्ती महाराज यांचे चिरंजीव इंद्रजीत शिंदे, भाऊ गिरीधर शिंदे, भागवत शिंदे, माऊली शिंदे तसेच स्व. नागेश शिंदे यांच्या परिवारातील पांडुरंग शिंदे, मुलगा दिनेश शिंदे, बचीरदादा शिंदे इतर अनेक जण होते. यावेळी ऋषिकेश कराड यांच्या समवेत भाजपाचे मंडळ अध्यक्ष प्रताप पाटील, पांडुरंग बालवाड, महादेव साळुंके, संजय ठाकूर, हनुमंत गव्हाणे, संजय सावंत व इतर अनेकजण होते. याप्रसंगी बोकनगाव येथील सरपंच दयानंद स्वामी, चेअरमन अजयकुमार शिंदे, भाजपाचे आत्माराम शिंदे, गंगाधर शिंदे, भालचंद्र दाताळ व इतर अनेक जण होते.

## थोडक्यात...

### युवासेना तालुका प्रमुख कुणाल राजपुत यांच्या वतीने मका विक्री करण्याचे आवाहन



**सोयगाव :** सोयगांव तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप पणन हंगाम २०२५-२६ अंतर्गत शासकीय आधारभूत किंमत योजने अंतर्गत भरड धान्य खरेदी केंद्राचे उद्घाटन दि.३० रोजी सिल्लोड-सोयगांव विधानसभेचे आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत सपन्न झाले. यावेळी शासकीय हमीभाव २४०० रुपये प्रती क्विंटल दराने मका खरेदी करण्यात येणार असल्याचे सांगितले त्यासाठी शेतकऱ्यांनी सोयगांव ता.सहकारी खरेदी विक्री केंद्र येथे जाऊन तात्काळ ऑनलाइन नोंदणी करून आपला माल विक्रीसाठी फर्दापुर येथील शासकीय धान्य केंद्रावर जाऊन विक्री करावी असे आवाहन युवासेना तालुका प्रमुख कुणाल राजपुत यांच्या वतीने केले व यासाठी राज्य सरकार कडे पाठपुरावा केला त्याबद्दल सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदारसंघाचे लाडके आ. अब्दुल सत्तार यांचे आभार मानले.

### भाबीजी घर पर है २.०' पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला

**छत्रपती संभाजीनगर :** लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है २.०' नव्या उत्साहात पुन्हा सुरू होत असून, ही मालिका २२ डिसेंबरपासून दररोज रात्री १०.३० वाजता प्रसारित होणार आहे. प्रेक्षक हिंदी झी ५वरही तिचे स्ट्रिमिंग पाहू शकतील. या नव्या पर्वात अभिनेत्री शिल्पा शिंदे १० वर्षांनंतर अंगूरी भाबीच्या भूमिकेत पुनरागमन करत आहेत. रहस्यमय घुंघटगंजमधील नव्या कथानकात नवी पात्रे, अनपेक्षित ट्विस्ट्स आणि भरपूर विनोद पाहायला मिळणार आहे. भाबीजींच्या अदलाबदलीमुळे वाढलेला विनोदी गोंधळ आणि मनोरंजक प्रसंग हे या मालिकेचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

### ४ जानेवारीपासून शिवकालीन स्व-संरक्षण प्रशिक्षण शिबिर

**छत्रपती संभाजीनगर :** युवक-युवतींमध्ये आत्मविश्वास, शारीरिक क्षमता व स्वसंरक्षण कौशल्य विकसित करण्यासाठी, वीरमाता जिजामाता व स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून 'शिवकालीन स्व-संरक्षण प्रशिक्षण शिबिर' आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर हिंदु जनजागृती समिती, राष्ट्र धर्म साधना प्रशिक्षण गुरुकुल व धर्मयोद्धा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येणार आहे. हे शिबिर दि. ४ ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान सकाळी व सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत धर्मवीर संभाजी महाराज विद्यालयाचे मैदान, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. शिबिरात स्वसंरक्षण तंत्र, लाठी-काठी, कराटे, हनुमान दंड बैठक, मुगदल, दांडपट्टा, युवक-युवती स्वसंरक्षणासाठी शारीरिक, मानसिक, बौद्धिक तसेच आध्यात्मिक सिद्ध व्हावे असे खेळ, मार्गदर्शन असे सर्व प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे शिबिर १५ ते ४० वयोगटातील युवक-युवतींसाठी मोफत असून सर्व साहित्य आयोजकांकडून उपलब्ध करून दिले जाणार आहे. पूर्वनोंदणी अनिवार्य असल्याचे आयोजकांकडून केले आहे.

### गंगापूर येथे भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन

**गंगापूर :** शहरात हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती व मूल्यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने भव्य हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले आहे. हे ऐतिहासिक संमेलन शुक्रवार, दिनांक जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार असून, मोठ्या संख्येने हिंदू बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. या हिंदू संमेलनास ह.भ.प. गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज, जगद्गुरू श्री १००८ स्वामी शांतिगिरीजी महाराज, ह.भ.प. गुरुवर्य महंत रामगिरीजी महाराज तसेच ह.भ.प. गुरुवर्य गाथामूर्ती रामभाऊजी महाराज राजत यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक प.पू. डॉ. मोहनजी भागवत हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत, ही या संमेलनाची विशेष बाब ठरणार आहे. या हिंदू संमेलनाचे आयोजन हिंदू संमेलन समिती, गंगापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी कालिका माता मित्र मंडळ, गंगापूर यांनी विशेष सहकार्य केले आहे. हे संमेलन जि. प. प्रा. शाळा मैदान, गंगापूर, ता. गंगापूर येथे पार पडणार आहे.

### टोयोटा ने ३,८८,८०१ युनिट्स विक्रीची नोंद केली

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने २०२५ या कॅलेंडर वर्षात आतापर्यंतची सर्वाधिक विक्री नोंदवत एकूण ३,८८,८०१ युनिट्सची विक्री केली असून, कॅलेंडर वर्ष २०२४ मधील ३,२६,३२९ युनिट्स च्या तुलनेत १९% वाढ नोंदवली आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत कायम राहिलेल्या सातत्यपूर्ण गतीमुळे ही कामगिरी शक्य झाली असून, बदलत्या ग्राहक अपेक्षांनुसार उच्च दर्जाची,विश्र्वासार्ह आणि सुरक्षित मोबिलिटी सोल्यूशन्स देण्यावर टीकेएम चा सातत्यपूर्ण भर असल्याचे अधोरेखित होते.

### 'इत्ती सी खुशी' मालिकेत गरिमा कौशलची एंट्री

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान)चा प्रवास उलगडून दाखवला आहे. आत्ता अन्विता संजय (ऋषी सक्सेना)च्या मनातील वाढती असुरक्षितता आणि विराट (रजत वर्मा)चा अजून मनावर असलेला प्रभाव यामध्ये सापडली आहे. त्यात विराटचे वडील राजनाथ वर्मा (फारूख सईद) यांच्या दमदार उपस्थितीमुळे मामला आणखीन गुंतागुंतीचा झाला आहे. अन्विताला कठोर निर्णय घ्यावे लागणार आहेत, ज्यात तिची ताकद आणि नाती यांची कसोटी होणार आहे.

### हेमंत खेर चे नाट्यमय पुनरागमन

**छत्रपती संभाजीनगर :** गुपिते, फसवेगिरी आणि असंभव वाटणारे पर्याय यांनी भरलेल्या दमदार कथानकाच्या बळावर सोनी सबवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. या मालिकेत एका गृहिणीमधून न्यायासाठी झगडणाऱ्या वकिलापर्यंतचा प्रवास करणाऱ्या पुष्पाची (करुणा पांडे) कहाणी उलगडून सांगितली आहे. मालिका आत्ता एका अत्यंत तीव्र आणि धक्कादायक टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. त्यात विरेन सेतलवाडच्या रूपात हेमंत खेरच्या पुनरागमनामुळे मालिकेतील नाट्य आणखीन वाढणार आहे.

### श्रद्धा, प्रेम, दिव्य आशीर्वाद लाभलेला हा विवाह आहे

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सबवरील 'गाथा शिव परिवार की -गणेश कार्तिकेय' ही मालिका एका नवीन टप्प्यात प्रवेश करत आहे. गणेशाचा मंगल विवाह सध्या केंद्रस्थानी असून मालिकेच्या कथानकाला लक्षणीय वळण देणारी ही घटना आहे. या बदललेल्या भागात आनंद सोहळा, कर्तव्य आणि बदल एकत्रित दिसतील आणि प्रथम पूज्य म्हणून गणेशाचे स्थान मजबूत होताना दिसेल. गणेश आपल्या जीवनाच्या या नवीन टप्प्यात केवळ धार्मिक विधींमध्येच नाही, तर जबाबदारी, विनम्रता आणि नेतृत्व या मूल्यांसाठीही सर्वात आधी पूजला जातो.

### सोयगाव बस आगारात सुरक्षितता अभियान उद्घाटन

**सोयगाव :** रा.प.सोयगाव आगारात सुरक्षितता अभियान २०२६ चे उद्घाटन प्राचार्य मनोज देशमुख यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी आगार प्रमुख मनिष जवळेकर,वाहतूक निरीक्षक सतिष अंभोरे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक कैलास बागुल, प्रमुख कारागीर प्रदिप जाधव, वरिष्ठ लिपिक सतिष पाटील उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमास आगारातील चालक, वाहक, यांत्रिकी तसेच प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख मान्यवरांचे हस्ते आगारातील ज्येष्ठ चालकांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान केला.

# लोकनेते आ. अब्दुल सत्तार यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळे वाटप




**सोयगाव :** लोकनेते आमदार अब्दुल सत्तार यांच्या वाढदिवसनिमित्ताने ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथे रुग्णांना फळे वाटप करताना वाटप मुख्याध्यापक अमोल पाटील जाधव व सर्व शिक्षक कर्मचारी. (छायाचित्र- साई बोखारे, सोयगाव)

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.१ जानेवारी :** सोयगाव शहरातील नॅशनल मराठी प्राथमिक शाळा सोयगाव तर्फे सिल्लोड-सोयगावचे आमदार अब्दुल सत्तार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम घेण्यात आले.

यावेळी नॅशनल मराठी प्राथमिक शाळा सोयगाव सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, सोयगाव येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप, सोयगाव येथील जिल्हा परिषद प्रशाळा येथे शालेय साहित्य वाटप, नॅशनल शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. नॅशनल मराठी शाळेत क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली.

यावेळी जावेद अब्दुल खालीक, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर आबा काळे, प्रमोद सोळुंके, शाळेचे मुख्याध्यापक अमोल पाटील जाधव यांच्यासह शिक्षक गजानन खराटे, सुबोध बिचारे, समाधान राकडे, गणेश खंडागळे, तुकाराम चव्हाण आदींसह सर्व उपस्थित होते.

## चद्रकांत दौड यांचा सेवा गौरव सोहळा



**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.१ जानेवारी :** सोयगाव पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेले पोलीस हवालदार चद्रकांत पंडीतराव दौड हे वयामानाने प्रदिर्घ ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त आले.

त्यांचा सोयगाव पोलीस स्टेशनच्या वतीने त्यांच्या सहपत्नीक गौरव सोहळा दि.३० डिसेंबर रोजी पोलीस स्टेशन येथे आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमच्या अध्यक्षपदी सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर हे होते.या सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार चद्रकांत दौड हे वयामानाने पोलीस खात्यातून १७ वर्ष सेवारत राहुण दि.३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचा सेवेचा गौरव करुन त्यांना सोयगाव पोलीस स्टेशनच्या वतीने शाल श्रीफळ भेट वस्तू देऊन त्यांना निरोप देण्यात आला.

यावेळी उपनिरीक्षक आरेकर यांनी बोलतानी सांगितले की चद्रकांत दौड हे एक शिस्तमय पोलीस कर्मचारी होते त्यांच्या कडून आम्हाला बरेच काही शिकायला मिळाले आहे तरी आमच्या सर्व सोयगाव पोलीस स्टेशनच्या वतीने त्यांना पुढील आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी चंद्रकांत दौड यांच्या कार्य बदल पोलीस कर्मचारी संदिप सुसर, सादीक तडवी, गजानन दांडगे, राजू सोनवणे, नारायण खोडे, अजय कोळी, संजय बाम्हदे यांनी दौड यांच्या कार्य विषयी मनोगत व्यक्त केले.

यावेळी पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर, संदिप सुसर, गजानन दांडगे, राजू सोनवणे, सादीक तडवी, अजय कोळी, श्रीकांत तळेगाव, राजू बरडे, नारायण खोडे, शांताराम सपकाळ, मिर्झा, संजय बाम्हदे, संजय सिंगल, प्रियंका बोडखे, होमगार्ड योगेश बोखारे, बापू लव्हाळे, प्रशांत जाधव आदींसह पोलीस कर्मचारी, मित्रपरिवार, दौड कुटुंब उपस्थित होते.

## साहित्यिका विद्या भोरजारे 'विदर्भभूषण'ने सन्मानित




**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१ जानेवारी :** विद्याभूषण फाऊंडेशन, नागपूर यांच्या वतीने आयोजित सामाजिक कार्यकर्ता सत्कार समारंभ दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, नागपूर येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाला. या कार्यक्रमात साहित्यिका विद्या भोरजारे यांना विदर्भ भूषण पुरस्कार २०२५ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. तसेच सत्कारमूर्ती नितेश कराळे (फिनिक्स अकॅडेमी) यांच्यासह विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार विकास ठाकरे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रदीप आगलावे (चरित्र साधने समिती) होते. प्रमुख उपस्थितीत डॉ. रमेश ठाकरे, वस्त्र उद्योग मंत्री संजय सावकारे, माजी खासदार गेहव आवारी तसेच निर्मल बँक ग्रुपचे संस्थापक प्रमोद मानमोडे यांचा समावेश होता. विशेष उपस्थिती म्हणून चंद्रपाल चौकसे, ज्येष्ठ समाजसेवक प्रा. प्रतापसिंग चौव्हान आणि प्रमोद काळबांधे उपस्थित होते. मान्यवरांनी केलेली भाषणे प्रेरणादायी ठरली. सत्कार समारंभ प्रसन्न वातावरणात आणि वैचारिक समन्वय साधत पार पडला.

कार्यक्रमाचे संचालन विद्या भूषण फाऊंडेशनचे डॉ. भूषण भस्मे, श्रीमती पूजा भस्मे आणि सहकारी मित्रपरिवार यांनी केले. त्यांच्या परिश्रमामुळे हा सत्कार समारंभ यशस्वीरीत्या पूर्ण झाला.

## धर्मतीर्थ क्षेत्रावर दोन गणिनी आर्यिका गुरूमाताजीच्या मिलन

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१ जानेवारी :** शहरापासून जवळच असलेले कचनेर जवळील श्री-क्षेत्र धर्मतीर्थ येथे गणिनी आर्यिका सौभाग्यमती माताजी ससंघाचे अगमन झाले.

यावेळी गणिनी आर्यिका आस्थाश्री माताजी यांनी सौभाग्यमती माताजीची गळा भेट करूण स्वागत केले व दोन्ही गुरू माताजीच्या वात्सल्य मिलन संपन्न झाले.

यावेळी युगल गणिनी आर्यिका माताजी यांनी क्रातींकारी राष्ट्रसंत आचार्य गुप्तीनंदी गुरूदेव सहसंघाचे भक्ती पूर्वक दर्शन घेतले यावेळी आर्यिका सौभाग्यमती माताजी यांनी आचार्य गुप्तीनंदी गुरूदेवाचे पाद पक्षालन व चरण वंदन केली यावेळी आचार्य श्रीनी माताजींना सिध्द शिलाण्यास समारोह मध्ये उपस्थित राहण्याचे आशिर्वाद दिले.

यावेळी आर्यिका माताजी यांनी धर्मतीर्थ क्षेत्रावर भगवंताचे दर्शन घेतले.यावेळी अध्यक्ष चंद्रशेखर पाटणी वरीष्ठ उपाध्यक्ष संजय पापडीवाल, उपाध्यक्ष राजेद्र पाटणी, महामंत्री पवन पापडीवाल, सहमंत्री सतिश लोहाडे, कोषाध्यक्ष गुलाबचंद कासलीवाल मार्गदर्शक सुनिल काला यांच्यासह धर्मराजश्री तपोभुमी दिगंबर जैन ट्रस्ट धर्मतिर्थ विकास समिती कचनेर यानी परीश्रम घेतले माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यांनी दिली आहे.



## आ. अब्दुल सत्तार : सिल्लोड सोयगाव तालुक्यांचे धुरंधर नेतृत्व

**अभिष्टचिंतन विशेष**



सिल्लोड सोयगाव तालुक्यातील विकास गंगा मोठ्या प्रमाणात खेचून आणून मतदार संघात विकास कामाची आहोटी लावणारा आमदार म्हणून सर्व जनसामान्यात त्यांची प्रतिमा आहे. वास्तववादी निर्णय घेणारे आणि विकासाला प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणजे आमदार अब्दुल सत्तार यांचे धुरंधर नेतृत्व होय.

सामान्य जनतेशी थेट ना जुळल्यामुळे त्यांच्या विविध अडीअडचणी समजून घेण्याची व संवेदनशीलता आणि उपयोजनाची ठाम अंमलबजावणी मतदार संघातील जनतेशी सातत्यपूर्ण संवाद. प्रश्नाची थेट दखल आणि निर्णयक्षम अंमलबजावणी ही त्यांच्या कार्यशाळेची ओळख आहे शिक्षण. आरोग्य पायाभूत सुविधा आणि सामाजिक समन्वय या क्षेत्रात त्यांनी सातत्याने सकारात्मक पावले उचलली आहे विकास म्हणजे सरकारी तिजोरीचे आकडे नव्हे तर त्या विकासातून जनसमान्याच्या राहणीमानात बदल व्हायला हवा असा प्रभ विचार करणारा एकमेव विकास विकसनशील पुरुष म्हणून त्यांच्या कामाकडे बघितले की प्रकर्षाने जाणवतो.

राजकारणात प्रामाणिकपणा. शिस्त आणि लोकभिमुखता जपणे हे आव्हानात्मक असते. तरीही. लोकांच्या विश्वासाला पातळ ठरणे आणि त्या विश्वासाच्या कामाला माध्यमातून सार्थ ठरवणे हेच त्यांचे खरे यश आहे. विरोधी मताचा सन्मान राखत सर्वसामावेशक विकासांचा विचार करणारे नेतृत्व समाजात पुढे येते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे माजी मंत्री अब्दुल सत्तार.

या त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांच्या आरोग्य संपन्न. यशस्वी आणि लोक कल्याणकारी कार्यासाठी मनपूर्वक शुभेच्छा त्यांचे धुरंदर नेतृत्व असेच समाजाला दिशा देत राहो आणि विकासाचा हा प्रवास अधिक बळकोट हीच सदिच्छा!

– शब्दांकन :
**शेख बाबू शेख भिकन**
**नगरसेवक, शाहूनगर**

## एमजीएममध्ये राष्ट्रीय हिंदी परिषदेचे आयोजन

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१ जानेवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील भारतीय तथा विदेशी भाषा संस्थेच्या वतीने ग़ज़लकार दुष्यंत कुमार यांच्या ५० व्या स्मृतिदिनानिमित्त दोन दिवसीय राष्ट्रीय हिंदी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद रविवार, दिनांक ४ जानेवारी आणि सोमवार, दिनांक ५ जानेवारी २०२६ रोजी एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे.

या दोन दिवसीय परिषदेसाठी पद्मश्री विजयदत्त श्रीधर, प्रसिद्ध ग़ज़लकार आलोक त्यागी, हिंदी प्रचार सभेचे अध्यक्ष डॉ.चंद्रदेव कवडे, सुप्रसिद्ध कवि ग़ज़लकार प्रदीप निफाडकर, कमलेश भट्ट कमल, प्रो. वशिष्ठ अनूप, राजेश बादल, प्रो. अनिल कुमार राय, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, संचालक डॉ. के. पी. सिंग, प्रा.डॉ. शहनाज बासमेह, प्रा.डॉ. सुरेखा लक्कस व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित असणार आहेत.

'पूरा रदीफ़, अधूरा क़ाफ़िया' या विषयावर आयोजित या राष्ट्रीय परिषदेत दुष्यंत कुमार यांच्या साहित्यिक योगदानावर सखोल व अभ्यासपूर्ण चर्चा होणार आहे.


### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

मा. श्री. एन. आर. इंदलकर, दिवाणी न्यायाधिश, (व.स्तर) न्यायालय गंगापूर

प्रकरणात पुढील तारीख ०९/०२/२०२६
सिव्हिल एम ए क्र.८७२/२०२५
अर्जदार:-१) कमलबाई बापू करडे वय ४६ वर्षे, धंदा घरकाम रा. अहिल्यादेवी नगर, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद, २) आकाश बापूसाहेब करडे वय ३० वर्षे रा. अहिल्यादेवी नगर, गंगापूर, ता.मो. नं. ७७५७९२५६५०, गंगापूर जि. औरंगाबाद. [illegible]

### जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस

मा. श्री. एम. ए. शेख, २ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापूर

प्रकरणात पुढील तारीख ०९/०२/२०२६
सिव्हील एम.ए. क्र. ८७४/२०२५
अर्जदार:- १)हिराबाई बंडु मनाळ वय ५२ वर्ष, धंदा घरकाम-रा. वाहेगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद मो.नं. ९९७०६०३७४०. २) नंदा बाबासाहेब मनाळ वय २८ वर्ष, धंदा घरकाम या.वाहेगाव [illegible]

### जाहीर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. छत्रपती संभाजीनगर

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं,३३२/२०२५
नि. क्र.
१) मिराबाई काशिनाथ बोडखे, वय ५१ वर्ष, धंदा घरकाम, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २)किरण काशिनाथ बोडखे, वय ३५ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३) राजेश काशिनाथ बोडखे, वय ३२ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.
विरुद्ध-निल
प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणं बाबत
सर्व संबंधितास जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड. सचिन सुनिल गिरी, रा.सोयगाव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.मयत कशिनाथ तुकाराम बोडी यांपा दिनांक ०२.११.२०२५ रोगी मौजे आमखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असून त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्रं.१ व ३ हे वारस आहे,असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार व ३ हे मयत कशिनाथ तुकाराम बोडखे यांचे वारस असून त्यांना शासकिय निमशासकिय कामासाठी वाराणसी आवश्यकता आहे.तरी ज्या कोणाला अर्जदाराण्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध कंल्यापासून ३० दिवसांच्या आत मा.न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी दिगांक ३१/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्यासह दिले असे.
पुढील तारीख -१६/२/२०२६
**क.लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय,सोयगाव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय,सोयगाव)**
**प्रतिलीपी**
**१. नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव**
**२. ग्रामपंचायत कार्यालय आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.**

### जाहीर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि.छत्रपती संभाजीनगर

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.३२५/२०२५
नि. क्र.
१)अंजनाबाई भगवान आगे, वय ७५ वर्ष, धंदा घरकाम, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २) समाधान भगवान आगे, वय ५४ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३)सुनील भगवान आगे, वय ५१ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४) लताबाई डिगबर बारी, वय ४९ वर्ष, धंदा घरकाम, रा. हनुमान गल्ली,शिरसोली,तालुका व जिल्हा जळगाव.
विरुद्ध - निल
प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत
सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते को, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड. सचिन सुनिल गिरी,रा.सोयगांव,ता.सोयगांव, जि.औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत भगवान फकीरा आगे यांचा दिनांक ०८.०१.२००९ रोजी मौजे आमखेडा, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असून त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ व ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ व ४ हे मयत भगवान फकीरा आगे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अंगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.आजरोजी दिनांक ३१/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पुढील तारीख -५/२/२०२६
**आदेशावरुन,**
**क.लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)**
**सहाय्यक अधीक्षक**
**( दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)**
**प्रतिलीपी : १. नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव, २. ग्रामपंचायत कार्यालय आमखेडा, ता.सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.**

## अग्रलेख...

# तिकिटांच्या तमाशाचे तात्पर्य

**"कुणी निष्ठेची गाठ सोडून पळाले,**
**कुणी खुर्चीच्या आशेने वेडे जाहले...**
**ज्यांनी जपली होती कधी तत्त्वे आणि मूल्ये,**
**त्यांच्याच हाती आज स्वार्थाचे निखारे आले!"**

१५ जानेवारीला महाराष्ट्र राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. सर्व राजकीय पक्षांनी त्यासाठी आघाड्या व युतीचे प्रयत्न करून पाहिले. शेवटच्या दिवसापर्यंत त्यांच्यातील वाटाघाटी ताणल्या गेल्या होत्या. इतक्या की, अनेक ठिकाणी आघाड्या होता होता तुटूनही पडल्या. साऱ्याच पक्षांच्या पुढाऱ्यांनी एका जागेसाठी आपल्या पाच-सहा कार्यकर्त्यांना निवडणुकीसाठी जोरदार तयारीचे आश्वासन देऊन ठेवले होते. शेवटी जागा एकच असल्याने ज्यांना ज्यांना तिकीट मिळाले नाही, त्यांनी अक्षरशः राडा केला. कुणी हंबरडा फोडला, कुणी लगेच राजीनामा दिला, कुणी बंडखोरी केली, तर कुणी आपल्याच नेत्याला नाही नाही तसे बोलले. चारचौघात नेत्यांची खरडपट्टी काढली. तक्रारी, वाद साऱ्याच पक्षांत झाले. नेत्यांच्या घरावर धावून जाणे, पक्षश्रेष्ठींच्या गाड्यांचा पाठलाग करणे, उमेदवारी अर्जाची पळवापळव करणे, पक्ष कार्यालयांवर दगडफेक करणे, तिकीट मिळाले नाही म्हणून बेशुद्ध होणे, स्वतःला जाळून घेण्याचा प्रयत्न करणे असे सारेच प्रकार झाले आणि ते सुसंस्कृत महाराष्ट्राला लाजवणारे ठरले आहेत. राजकारण कोणत्या थराला पोहोचले आहे याचे हे प्रदर्शन होते. कधी नव्हे, तो तिकीट वाटपाचा जंगी जोरदार तमाशा महाराष्ट्र राज्याने यंदा बघितला. पूर्वी तमाशा बघायला पैसे लागायचे; पण मंगळवारी जनतेने तो फुकटातच बघितला आणि त्याचे कवित्व कित्येक वर्षे मनोरंजनाला पुरणार आहे! या घटना वरकरणी हास्यास्पद किंवा गमतीच्या किंवा भावनिक अतिरेकाच्याही वाटतील. प्रत्यक्षात त्या फार गंभीर आहेत.

महाराष्ट्र ही संतांची, विचारांची भूमी आणि प्रबोधनाची पंढरी मानली जाते. कधी काळी येथे राजकारण-समाजकारण बऱ्यापैकी नैतिक असायचे. आता सारेच संपल्यात जमा आहे. महानगरपालिका निवडणुकांच्या उमेदवारीचे तिकीट वाटपादरम्यान हा जो काही प्रकार घडला, तो केवळ राजकीय गोंधळ नव्हता; तर राजकारणातल्या नैतिक मूल्यांचा, वैचारिक भूमिकांच्या अंत्येष्टीचा सोहळा होता. पूर्वी निवडणुकीचे तिकीट म्हणजे जनसेवेची संधी मानली जायची. आता तो 'व्यवसाय' झाला आहे. राजकारण हे समाजसेवेचे माध्यम न राहता तो फायदेशीर 'धंदा' बनला आहे. अपवाद वगळता, तरुण कार्यकर्ते आज राजकारणाकडे आकर्षित होतात ते ध्येयवादामुळे नव्हे, तर आपल्या नेत्यांना अल्पावधीत 'गब्बर' होताना बघूनच! त्यांना दिसते, की अवघ्या पाच वर्षांत नेत्यांची संपत्ती जेमतेमवरून कोट्यवधीच्या घरात पोहोचली आहे. महागड्या गाड्या, बंगले आणि त्यांचे शाही राहणीमान कार्यकर्त्यांना भुरळ घालत असते. अनेकदा ईर्ष्याही निर्माण होत असते. मग तो कार्यकर्ताही नेत्याच्याच मार्गाने चालू लागतो. लहानमोठ्या समाजसेवेपासून सुरुवात करतो. संधी मिळताच राजकारणात प्रवेश करतो आणि कुठल्याही परिस्थितीत निवडणुकीची उमेदवारी मिळावी म्हणून वाट्टेल ते करायला तयार असतो. संधी हुकली की मग त्याला पक्षनिष्ठा, राजकीय शुचितेचे अजिबात भान उरत नाही. आपण काल अमक्या पक्षाचे किंवा विचारांचे निष्ठावंत होतो हे लगेच विस्मरणात जाते आणि सत्तेची खुर्ची तेवढी नजरेत आणि काळजात घर करून बसते. त्यातून असे वर्तन घडते. पोहऱ्यातच नसेल तर सुपात येणार कुठून? जेव्हा त्याचे हितसंबंध आणि मनसुबे धोक्यात येतात, तेव्हा मग असा 'राडा' होतो. मंगळवारी असेच काहीसे चित्र महाराष्ट्रापुढे आले. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत उमेदवारांची यादी पक्षांनी जाहीर न केल्याने दिवसभर तिष्ठत राहिलेल्या संतप्त उमेदवारांनी आणि त्यांच्या समर्थकांनी गोंधळ घातला. तिकीट मिळाले नाही म्हणून अनेक लोक थेट नेत्यांच्या घरावर धावून गेले, अनेकांनी पक्षाच्या कार्यालयांची तोडफोड केली. आत्मदहनाचे, बेशुद्ध होण्याचे नाट्यही रंगले. हा तमाशा केवळ कार्यकर्त्यांचा नव्हता, तर तो विद्यमान राजकारणाच्या वैचारिक दिवाळखोरीचाही होता. नेत्यांच्या आश्वासनखोरीचे वाभाडे काढणाराही होता.

आज जे कार्यकर्ते उमेदवारी मिळाली नाही म्हणून रस्त्यावर राडा घालताहेत, नेत्यांच्या गाड्या अडवताहेत, तेच जर उद्याचे नेते होणार असतील आणि हीच जर येत्या काळाची राजकीय संस्कृती ठरणार असेल, तर ती अराजकतेची नांदी समजली पाहिजे. महाराष्ट्राच्या राजकीय भविष्याबद्दल तीव्रतेने चिंता वाटावी असेच हे चित्र आहे. पूर्वीच्या काळी पक्षात मतभेद असायचे. वादही व्हायचे. पण पक्ष, विचार आणि नेते यांच्याप्रति आदर होता. नेत्यांच्या शब्दाला मान होता. नेते कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहायचे. समजून काढायचे. नेते व कार्यकर्ते दोघांतही पक्षनिष्ठा दिसायची. आज निष्ठा ही केवळ 'सत्तेच्या सोयीनुसार' बदलणारी वस्तू झाली आहे. राजकीय पक्षांचे नेते व्यासपीठावरून ओरडून सांगतात, की आमच्याकडे परिवारवाद, भाई-भतिजावाद, नातलगशाही नाही. आम्ही सामान्य कार्यकर्त्याला न्याय देतो. पण प्रत्यक्ष निवडणुकीच्या तिकीट वाटपाच्यावेळी आमदार-खासदारांच्या घरातच दोन-दोन, तीन-तीन जणांना उमेदवारी दिली जाते. अशात ज्या कार्यकर्त्यांनी वर्षानुवर्षे सतरंज्या उचलल्या, ज्यांनी पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन उन्हातान्हात मिरवला, त्यांच्या वाट्याला केवळ नेत्यांच्या गाड्यांचा पाठलाग करणे आणि ऊर बडवणेच येत असेल, तर ते गंभीर दखल घेण्यासारखे आहे. आता तर हा 'भाई-भतिजावाद' इतका फोफावला आहे की, कर्तृत्वापेक्षा रक्ताच्या नात्याला आणि पैशाला जास्त महत्त्व आले आहे. पुढारी जे बोलतात आणि जे करतात, त्यात जमीन-अस्मानाचे अंतर असते. राजकारणाच्या बाजारात सारे एकाच माळेचे मणी असल्याचे दिसत असून, आतापर्यंत होते ते वैचारिक गांभीर्य राजकारणातून हरवत चालले आहे, असा या घटनांचा अर्थ आहे.

साऱ्याच पक्षांत गटबाजीचे स्तोम माजले आहे. कार्यकर्त्याने कायम कार्यकर्ता राहिले पाहिजे असे नेत्याला वाटते. कारण त्याला त्याची खुर्ची जाण्याचे कायम भय असते. एखादा कार्यकर्ता मोठा झाला की, मग गटबाजीचे राजकारण सुरू होते. आता राजकारणात विचारधारेला जागाच उरली नाही. निष्ठेला वाव नाही. जो निवडून येण्याची क्षमता ठेवतो; मग तो गुंड, भ्रष्टाचारी असो की, आयाराम-गयाराम असो; त्याच्यासाठी पायघड्या घातल्या जातात. ज्या राज्यात समाजसुधारकांच्या आणि ध्येयवादी नेत्यांच्या विचारांची चर्चा व्हायची आणि आचरणही व्हायचे, त्याच राज्यात आज 'एबी फॉर्म'साठी नेत्यांच्या गाड्यांचा जीवघेणा पाठलाग व्हावा, हे लोकशाहीतील वैचारिक भूमिका आणि निष्ठांच्या अधोगतीचे सर्वांत विदारक लक्षण मानले पाहिजे. मंगळवारी कार्यकर्त्यांनी जो राडा घातला, तो विचारधारेसाठी नव्हता. नेत्यांच्या मागे फिरण्यात आणि त्यांची सरबराई करण्यात जो खर्च झाला, त्या गुंतवणुकीच्या परताव्यासाठी होता. तिकीट मिळाले नाही म्हणून आत्मदहनाचा प्रयत्न करणे किंवा ढसाढसा रडणे, हंबरडा फोडण्याचे दृश्य निव्वळ हास्यास्पद नसून, ते भविष्यासाठी चिंताजनकही आहे. हेच कार्यकर्ते उद्याचे लोकप्रतिनिधी होणार असतील, तर महाराष्ट्राच्या भविष्यातील राजकारणात कितपत गांभीर्य उरेल याचा अंदाज न लावलेलाच बरा. साऱ्याच पक्षांसमोर बंडखोरीचे मोठे आव्हान आहे. ते शमवण्यासाठी शीर्ष नेतृत्वाला मोठी कसरत करावी लागेल. काही पक्ष 'डॅमेज कंट्रोल' करण्यासाठी पुढे सरसावले आहे. मात्र, या संपूर्ण तिकीट तमाशात सर्वाधिक नुकसान सामान्य जनतेचे आणि लोकशाहीच्या पावित्र्याचे झाले आहे. या राजकीय तमाशाची किंमत सर्वसामान्य मतदाराला आपल्या मूलभूत सोयीसुविधा आणि विकासाचा बळी देऊन मोजावी लागणार आहे. राजकारण जेव्हा ध्येयवादाकडून धंदेवाईकतेकडे झुकते, तेव्हा असा राडा अटळ असतो. आता प्रश्न हा उरतो की, जनता या तमाशाची मूक प्रेक्षक बनून राहते की लोकशाहीच्या मतपेटीतून या साऱ्या प्रवृत्तींना कायमचा धडा शिकवते? राजकारणाच्या या खालावलेल्या पातळीला वेळीच आवर घातला नाही, तर येणारा काळ सत्तेचा नक्की असेल, मूल्यांचा मात्र नक्कीच नसेल! तिकिटांच्या तमाशाचे तात्पर्य हेच. ▮

## तंत्रवेध

### डॉ. दीपक शिकारपूर

# 'ध्रुव ६४' भारताचे धुरंधर यश

आजच्या आधुनिक युगात डाटा हे नवीन इंधन आहे आणि तो डाटा प्रोसेस करणारे मायक्रोप्रोसेसर हे त्या इंजिनाचे हृदय आहे. आतापर्यंत भारत प्रोसेसरसाठी इंटेल, एन्विडिया किंवा एएमडीसारख्या विदेशी कंपन्यांवर अवलंबून होता. परंतु, 'आत्मनिर्भर भारत' अभियानांतर्गत भारताने स्वतःचे स्वदेशी मायक्रोप्रोसेसर विकसित करण्यास सुरुवात केली आहे. याच प्रवासातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजे ध्रुव ६४ मायक्रोप्रोसेसर. ध्रुव ६४ हे भारताचे पहिले स्वदेशी ६४ बिट ड्युअल कोअर मायक्रोप्रोसेसर आहे, ज्याची घोषणा डिसेंबर २०२५ मध्ये झाली. हे सी-डॅकने डिजिटल इंडिया रिस्क-व्ही (डीआयआर-व्ही) कार्यक्रमांतर्गत विकसित केले असून १.० गीगाहर्ट्झ क्लॉक स्पीडवर कार्य करते. आजचे युग हे सिलिकॉनचे युग आहे. ज्या देशाकडे स्वतःचे चिप तंत्रज्ञान आहे, तोच देश जगावर राज्य करेल अशी स्थिती आहे. त्यामुळे ध्रुवचे महत्त्व वाढले आहे. हा प्रोसेसर ६४-बिट क्षमतेचा आहे, याचा अर्थ तो एकाच वेळी मोठ्या प्रमाणात माहितीवर प्रक्रिया करू शकतो. ध्रुव ६४ हा रिस्क ५ (रिड्युस्ड इंस्टक्शन्स सेट कॉम्प्युटर ५) या ओपन-सोर्स आर्किटेक्चरवर आधारित आहे. यामुळे भारताला परवाना शुल्कासाठी परदेशस्थित कंपन्यांना पैसे द्यावे लागत नाहीत. हा प्रोसेसर अशा प्रकारे डिझाईन केला आहे ज्यामुळे अत्यंत कमी ऊर्जेवर काम करतो. परिणामी, बॅटरीवर चालणाऱ्या उपकरणांसाठी तो उत्तम ठरतो. स्वदेशी बनावटीचा असल्याने यामध्ये देशाचा डाटा सुरक्षित राहतो. ध्रुव ६४ केवळ प्रयोगशाळेपुरता मर्यादित नाही; त्याचा वापर अनेक क्षेत्रांमध्ये तसेच स्मार्ट वॉच, डिजिटल कॅमेरे आणि घरगुती उपकरणांमध्ये होऊ शकतो.

आणखी काही वैशिष्ट्ये म्हणजे राऊटर्स, मोडेम आणि स्विचमध्ये स्वदेशी प्रोसेसर वापरल्याने सायबर सुरक्षेचा धोका कमी होतो. भारतीय लष्कराची उपकरणे, क्षेपणास्त्र प्रणाली आणि इस्रोच्या उपग्रहांमध्ये ध्रुव ६४ सारखे स्वदेशी प्रोसेसर अत्यंत महत्त्वाचे ठरतील. कारखान्यांमधील रोबोट्स आणि कंट्रोल सिस्टिम्स चालवण्यासाठी याचा वापर होऊ शकतो. या उत्पादनामुळे आत्मनिर्भर भारत अभियानाला चालना मिळू शकते. आत्मनिर्भर भारत म्हणजे केवळ भारतात वस्तू बनवणे नव्हे, तर भारताची स्वतःची बुद्धिमत्ता विकसित करणे होय. ध्रुव ६४ या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल आहे. ध्रुव ६४ आत्मनिर्भर भारत अभियानाचे प्रतीक आहे, जे आयात अवलंबित्व कमी करून २० लाख कोटींच्या अर्थव्यवस्थेला गती देते. आयएसएम आणि डीएलआय योजनांखाली हे स्वदेशी उत्पादन, नोकऱ्या आणि निर्यात वाढवेल. हे अभियान ग्रामीण रोजगार, पायाभूत सुविधा आणि डिजिटल अर्थव्यवस्थेला मजबूत करेल. सी-डॅकसारख्या संस्था सेमीकंडक्टर कार्यबल तयार करतील. परिणामी, भारत जागतिक पुरवठा साखळीत मजबूत होईल. भारत दरवर्षी अब्जावधी डॉलर्सच्या सेमीकंडक्टर चिप्स आयात करतो. ध्रुव ६४ मुळे ही आयात कमी होऊन परकीय चलन वाचेल. एखादा स्वदेशी प्रोसेसर येतो, तेव्हा त्याच्यासोबत सॉफ्टवेअर डेव्हलपर्स, इंजिनीअर्स आणि मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स असे मोठे जाळे तयार होते. यामुळे भारतीय स्टार्टअप्स आता स्वदेशी प्रोसेसरचा वापर करून नवीन उत्पादने बनवू शकतील.




भारत सध्या जगाचे सॉफ्टवेअर हब आहे, पण हार्डवेअरमध्ये आपण मागे होतो. ध्रुव ६४ मुळे हे चित्र बदलत आहे. जग सध्या चिप्ससाठी चीन आणि तैवानवर अवलंबून आहे. भारतीय बनावटीचे प्रोसेसर हे जागतिक दर्जाचे असूनही किमतीने स्वस्त असतील; ज्यामुळे विकसनशील देशांच्या बाजारपेठेत भारत नेतृत्व करू शकेल. कोणत्याही नवीन टेक स्टार्टअपसाठी लायसन्स फी हा एक मोठा अडथळा असतो. एखाद्या स्टार्टअपला परदेशी प्रोसेसर वापरायचा असल्यास कोट्यवधी रुपये रॉयल्टी म्हणून द्यावे लागतात. ध्रुव ६४ ओपन सोर्स तंत्रज्ञानावर आधारित असल्याने स्टार्टअप्सना परवाना शुल्काची चिंता करण्याची गरज नाही. यामुळे उत्पादनाचा खर्च ३० ते ४० टक्क्यांनी कमी होऊ शकतो. परिणामी, भारतीय स्टार्टअप्स आता स्वस्त दरात स्वतःचे मदरबोर्ड आणि कंट्रोलर बनवू शकतील. यामुळे स्मार्ट वॉच, ड्रोन किंवा ई-सायकल बनवणारे स्टार्टअप्स जागतिक बाजारात स्पर्धा करू शकतील. 'डिजिटल इंडिया' आणि 'चिप टू स्टार्टअप'सारख्या योजनांमुळे अशा स्टार्टअप्सना सरकारकडून आर्थिक मदत आणि तांत्रिक सहकार्य सहज उपलब्ध होत आहे.

सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी स्वदेशी प्रोसेसर म्हणजे एक अभेद्य किल्ला आहे. परदेशी चिप्समध्ये बॅकडोअर असू शकतात, पण ध्रुव ६४ पूर्णपणे पारदर्शक असल्याने सुरक्षित डेटा प्रोसेसिंग शक्य आहे. डिझाइनर्स, स्टार्टअप्स आणि संशोधक एकत्रितपणे स्वदेशी चिप्सचा वापर करतात, तेव्हा देशाच्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होतो. यामुळे चिप डिझाइनिंग, फॅब्रिकेशन, असेम्बली आणि टेस्टिंग या क्षेत्रांमध्ये लाखो नवीन नोकऱ्या निर्माण होतील. केवळ सॉफ्टवेअरमध्येच नव्हे, तर हार्डवेअर इंजिनीअरिंगमध्येही भारत 'जॉब हब' बनू शकेल. आणखी एक दखलपात्र बाब म्हणजे भविष्यात भारत केवळ स्वतःच्या गरजा भागवून थांबणार नाही, तर आफ्रिका, दक्षिण आशिया आणि दक्षिण अमेरिकेतील देशांना ध्रुव ६४ वर आधारित स्वस्त आणि दर्जेदार उत्पादने निर्यात करू शकेल. ध्रुव ६४ ने मोठी संधी उपलब्ध करून दिली असली, तरी आपल्याला सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन (चिप बनवण्याचे कारखाने) मध्ये अधिक गुंतवणूक करावी लागेल. स्टार्टअप्सना या चिप्सचा वापर करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण कार्यक्रम राबवावे लागतील. ध्रुव ६४ नंतर धनुष आणि धनुष+ प्रोसेसर विकसित होत असून ऑक्टा-कोअरपर्यंत जाईल. डीआयआर-व्ही कार्यक्रमांतर्गत भारत ओपन प्रोसेसर तंत्रज्ञानाचे जागतिक केंद्र बनेल. इंडिया सेमीकंडक्टर मिशन (आयएसएम) अंतर्गत १.६० लाख कोटींच्या गुंतवणुकीसोबत हे २०३० पर्यंत ११० अब्ज डॉलरची बाजारपेठ साध्य करेल. ध्रुव ६४ सारख्या चिप्समुळे भारत स्वदेशी डिझाईन इकोसिस्टिम मजबूत करेल. धनुष+ सारख्या पुढील पिढ्या संरक्षण आणि हाय-परफॉर्मन्स कॉम्प्युटिंगसाठी तयार होतील.

गेल्या ३० वर्षांमध्ये आपण सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये बरीच प्रगती केली असून हजारो उद्योग तसेच लाखो रोजगार निर्माण केले. आता पुढील दशक इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर उद्योगाचे असेल. याचा व्यूहात्मक फायदा आयात कमी करून स्थानिक व्यवसाय आणि रोजगारनिर्मिती हा पण असेल. या उद्योगांना शेकडोंच्या संख्येने अनेक प्रकारचे कौशल्यवान अभियंते लागतील. अनेक जागतिक चिप डिझाईन कंपन्यांची संशोधन आणि विकास केंद्रे भारतात आहेत. या संधीचा फायदा घेऊन भारत चिप डिझाईन आणि सॉफ्टवेअरच्या क्षेत्रात आपले स्थान अधिक मजबूत करू शकतो. भारतीय कंपन्या सेमीकंडक्टर फॅब्स उभारून फक्त उत्पादनच नाही, तर चिप डिझाईनमध्येही आपली क्षमता वाढवू शकतात. या गुंतवणुकीमुळे भारतातील तरुणांना उच्च दर्जाचे रोजगार उपलब्ध होतील आणि देश तंत्रज्ञानाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल. ▮

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# दिग्गीराजा आणि संघ, भाजपाचे कौतुक

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आपला १४० वा स्थापना दिन नुकताच साजरा केला. काँग्रेसच्या या स्थापना दिन समारंभाच्या आधी ज्येष्ठ काँग्रेस नेते आणि मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजयसिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे एक छायाचित्र एक्सवर पोस्ट करत खळबळ उडवली. या छायाचित्रात भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी खुर्चीवर बसलेले दिसत असून त्यांच्यासमोर जमिनीवर मांडी घालून बसलेले नरेंद्र मोदी आहेत. जो नेता एकेकाळी काहीच नव्हता, म्हणजे फक्त पक्षाचा प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्ता होता, तो नंतर गुजरातचा मुख्यमंत्री झाला, देशाचा पंतप्रधानही झाला, असे फक्त रा. स्व. संघ आणि भाजपातच होऊ शकते, असे दिग्विजयसिंह यांना म्हणायचे होते.

असे करत दिग्गीराजा यांनी रा. स्व. संघ आणि भाजपाच्या कार्यपद्धतीची प्रशंसा करून काँग्रेसच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, असे म्हणावे लागेल. काँग्रेसमध्ये सुधारणा करण्याची तसेच अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याची मागणी करत काँग्रेसच्या नेतृत्वाला घरचा अहेरही त्यांनी केला होता. तळागाळातील कार्यकर्ता फक्त भाजपातच मुख्यमंत्री होऊ शकतो, पंतप्रधान बनू शकतो, काँग्रेसमध्ये ते शक्य नाही, असे दिग्गीराजा यांना म्हणायचे असावे. काँग्रेसमध्ये पंतप्रधानपद हे नेहरू आणि गांधी घराण्यातील लोकांसाठीच राखीव होते. त्यामुळे पंडित जवाहरलाल नेहरूनंतर त्यांच्या कन्या इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या आणि इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर राजीव गांधी यांच्या गळ्यात पंतप्रधानपदाची माळ पडली. राजीव गांधी यांच्या हत्येनंतर सोनिया गांधी यांनी पंतप्रधानपद मिळवण्याचा प्रयत्न केला. पण तत्कालीन राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी हा प्रयत्न हाणून पाडला. २०१४ पासून राहुल गांधी पंतप्रधानपदासाठी जीव तोडून प्रयत्न करत आहे, पण देशातील जनता त्यांना या पदावर येऊ देत नाही. आतापर्यंत भाजपमध्ये पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांना फक्त सतरंज्याच उचलाव्या लागतात, असा आरोप केला जायचा. २०१४ मध्ये देशात पहिल्यांदा भाजपाचे स्वबळावर स्पष्ट बहुमताचे सरकार आल्यानंतर यास्थितीत बदल झाला आहे. पक्षाच्या तळागाळातील प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांना मान मिळू लागला, अधिकाराची पदे दिली जाऊ लागली. तसे नसते तर डॉ. मोहन यादव यांची मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाली नसती, भजनलाल शर्मा यांच्याकडे राजस्थानचे मुख्यमंत्रिपद आले नसते आणि विष्णुदेव साय छत्तीसगडचे मुख्यमंत्री झाले नसते. मुख्यमंत्री होण्याआधी डॉ. मोहन यादव, भजनलाल शर्मा आणि विष्णुदेव साय यांचे नाव राज्याबाहेरच्या जनतेला फारसे माहीतही नव्हते. बिहारमधील युवा भाजपा नेते नितीन नबीन यांची भाजपाचे नवे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड करत भाजपाच्या नेतृत्वाने पक्षातील प्रामाणिक, समर्पित आणि निष्ठावान कार्यकर्त्यांना संधी देण्याच्या आपल्या याच धोरणाचा परिचय करून दिला आहे. मोदी आणि शाह यांनी पक्षाचे नवे अध्यक्ष म्हणून नितीन नबीन यांची निवड कशी केली, याचे उत्तर राजधानी दिल्लीतील राजकीय वर्तुळाला तसेच माध्यमातील लोकांना अजूनही मिळाले नाही आणि बहुधा ते शेवटपर्यंत मिळणारही नाही. याचेच उत्तर दिग्विजयसिंह यांनी एक छायाचित्र एक्सवर पोस्ट करत देण्याचा प्रयत्न केला, असे म्हणावे लागेल. यातून त्यांनी रा. स्व. संघ आणि भाजपाच्या कार्यपद्धतीचाही गौरवपूर्ण उल्लेख केला, तसेच काँग्रेस पक्षात अशी कार्यपद्धती नसल्याबाबत खेदही व्यक्त केला, असे म्हणावे लागेल. त्यामुळेच काँग्रेसने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करावी, तसेच अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याचा सल्लाही दिला. सध्या काँग्रेस पक्षात अधिकारांचे केंद्रीकरण झाले असल्याचा टोला, यातून त्यांनी मारला आहे. मल्लिकार्जुन खडगे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत, पण पक्षात कोणताच निर्णय खडगे यांना आपल्या अधिकारात घेता येत नाही, प्रत्येक निर्णयासाठी त्यांना राहुल गांधी यांची परवानगी घ्यावी लागते. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निर्णय घेण्याचा अधिकार खडगे यांना मिळाला तर पक्षाचे आज जेवढे नुकसान होत आहे, तेवढे कदाचित झाले नसते.

राहुल गांधींना राजकीय अनुभव नाही आणि समज तर त्याहून नाही. त्यामुळेच दिग्विजयसिह यांच्यासारखे नेते आता उघडपणे बोलू लागले. खरं म्हणजे याची सुरुवात पाच सहा वर्षांपूर्वी काँग्रेसमधील 'जी २३' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गटाने एक पत्र पाठवून केली होती. पण नंतर 'जी २३' मधील बहुतांश नेते फार काळ आपल्या भूमिकेवर ठाम राहू शकले नाहीत. यातील काही नेत्यांना काँग्रेस नेतृत्वासमोर शरणागती पत्करावी लागली.

नंतर काँग्रेसमध्ये शशी थरूर यांनी आवाज उठवला. राहुल गांधी रा. स्व. संघ आणि भाजपाच्या कार्यपद्धतीवर हल्ला चढवत असताना काँग्रेसमधील काही नेते रा. स्व. संघ आणि भाजपाच्या कार्यपद्धतीची प्रशंसा करतात, यातून राहुल गांधी यांनी काय ते समजून घ्यायला पाहिजे. खरं बोलायला हिंमत लागत असते, ती हिंमत काँग्रेसमध्ये आज शशी थरूर, दिग्विजयसिंह आणि रशीद अल्वीसारखे नेते दाखवत आहेत, त्यामुळे त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. काँग्रेस नेते रशीद अल्वी यांनी काँग्रेसच्या दुर्दशेला पक्षाचे नेतृत्व जबाबदार असल्याचा आरोप केला. काँग्रेस नेत्यांचा रोष सोनिया गांधींपेक्षा राहुल गांधींवर जास्त आहे. याला राहुल गांधींची कार्यशैली जबाबदार आहे. ते पक्षातील नेत्यांना भेटत नाही. रशीद अल्वी यांनी हाच आरोप केला आहे. त्यामुळेच काँग्रेसचे नेतृत्व प्रियांका वढेरा यांच्याकडे सोपवण्याची मागणी केली जात आहे.

काँग्रेसच्या नेतृत्वाला घरचा अहेर करताना रशीद अल्वी यांनी रा. स्व. संघाची प्रशंसा केली. रा. स्व. संघ हे मजबूत संघटन आहे आणि संघामुळेच भाजपा सत्तेवर आहे, असे अल्वी म्हणाले. काँग्रेसच्या नेत्यांनी रा. स्व. संघ आणि भाजपाच्या कार्यपद्धतीची तसेच संघटनशक्तीची प्रशंसा करण्याची ही पहिलीच वेळ नाही. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी विधानसभेत रा. स्व. संघाची प्रार्थना म्हणून दाखवली होती. नंतर त्यांनी यासाठी माफी मागितली, हा भाग वेगळा. कर्नाटकमधील काँग्रेसचे अन्य एक आमदार एच. डी. रंगनाथ यांनीही शिवकुमार यांच्यानंतर संघाची प्रार्थना म्हटली. विशेष म्हणजे या प्रार्थनेत गैर काही नाही, यात मातृभूमीची स्तुती आहे, असे ते म्हणाले होते. ओडिशातील ज्येष्ठ काँग्रेस नेते, माजी मंत्री आणि विधानसभेचे माजी सभापती किशोर पटेल यांनीही संघाची प्रशंसा केली होती. संघ १०० वर्षांपासून हिंदुत्वाचे रक्षण तसेच चरित्रनिर्माणाचे काम करत आहे, असे सांगत पटेल यांनी संघ स्वयंसेवकांमधील शिस्त, समर्पण आणि देशभक्तीच्या भावनेची स्तुती केली होती. मध्यप्रदेशमधील काँग्रेस आमदार भेरोसिंह परिमार यांनीही रा. स्व. संघाशी आपले जुने संबंध असल्याचा दाखला दिला होता. सध्या तेलंगणाचे मुख्यमंत्री असलेले काँग्रेसचे नेते रेवंथ रेड्डी विद्यार्थिदशेत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते होते. जो कधीकाळी संघाच्या संपर्कात आला, तोच संघाची प्रार्थना म्हणू शकतो, संघाशी ज्याचा दूरदूरपर्यंत संबंध नसतो, तो कधीच ही प्रार्थना म्हणू शकत नाही. त्यामुळे राहुल गांधी संघावर टीका करत असताना त्यांच्या काँग्रेस पक्षातील काही नेते संघाची जाहीरपणे प्रशंसा करतात, हे अतिशय बोलके म्हणावे लागले. ▮

९८८१७१७८१७

## वेध

### नंदकिशोर काथवटे

# नववर्ष : बदलाची वेळ

नवीन वर्ष दारात उभं आहे. प्रत्येक वर्षाच्या पहाटेसोबत आशा, अपेक्षा आणि प्रश्न एकत्र डोकं वर काढतात. गेल्या वर्षाचा विचार केला तर सरकारच्या घोषणा मोठ्या होत्या, पण परिणाम मात्र छोटा होता. विकासाच्या नादात पर्यावरणाचं नुकसान, शिक्षण क्षेत्रातील असमानता, आरोग्य सेवांतील तुटवडा आणि रोजगाराच्या संधींची कमतरता या गोष्टींनी नागरिकांच्या मनात निराशा निर्माण केली. केवळ घोषणांनी, जल्लोषांनी आणि जाहिरातींनी देशाचा कायापालट होत नाही, तर त्यामागच्या निर्णयक्षम कृतीने होतो. गेल्या वर्षी अनेक योजना आणल्या गेल्या, पण त्या कागदावरच ठरल्या. काही योजनांना निधीच मिळाला नाही, काहींची जाहिरात जास्त झाली पण अंमलबजावणी कमी. शेतकऱ्यांना मदत म्हणून जाहीर केल्या जाणाऱ्या योजनांमध्ये फॉर्म भरताना नागरिक थकले, पण त्यांच्या वाट्याला फक्त 'प्रतीक्षा'च आली. आरोग्य विभागात डॉक्टर नाहीत, औषधं नाहीत आणि रुग्णालये आहेत पण सेवा नाही. अशा परिस्थितीत नागरिकांचा विश्वास उडणं स्वाभाविक आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगार ही तीन क्षेत्रे यंदाच्या वर्षी प्राधान्याने सुधारलेच पाहिजेत. शिक्षणात कौशल्यविकासाला महत्त्व देणे गरजेचे आहे. शहरी व ग्रामीण शाळांमधील तफावत कमी व्हायला हवी. शिक्षकांसाठी प्रशिक्षण, विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक साधने आणि अभ्यासक्रमात उद्योग-धंद्यांशी जोडणारे बदल घडवायला हवेत. शिक्षण केवळ परीक्षा पास होण्यासाठी नसून, जीवनासाठी तयार करण्यासाठी असले पाहिजे. आरोग्यसेवेबाबत सरकारने विम्याची भाषा वापरली, पण रुग्णालयात उपचारच मिळाले नाहीत तर विमा कशासाठी? गरीब रुग्णांची बिलांमध्ये दमछाक होते, एखादा गंभीर आजार त्याला दारिद्र्याच्या खाईत लोटतो. मध्यमवर्ग लाजत-लपवत कर्ज काढतो आणि श्रीमंतच फक्त सुरक्षित राहतो अशी व्यवस्था असणे म्हणजे हा विकासाचा पराभव आहे. जिल्हा रुग्णालयांमध्ये डॉक्टर, यंत्रसामग्री आणि औषधं उपलब्ध करण्यासाठी बजेट वाढवणे आणि त्याचे पारदर्शक लेखांकन नागरिकांसमोर ठेवणे आवश्यक आहे. रोजगार हा सर्वांत मोठा प्रश्न आहे. तरुणांमध्ये ऊर्जा आहे, स्वप्ने आहेत, पण संधी नाहीत. उद्योजक बना म्हणणे सोपे आहे, पण कर्ज, परवाने, जागा, कर आणि बाजारपेठ मिळावी यासाठी सरकारने सुगम मार्ग तयार केला नाही तर उद्योजकता स्वप्नातच राहते.

कौशल्यविकास कार्यक्रम, स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन आणि कंत्राटी नोकऱ्यांवरील नियमन हे निर्णायक पाऊल यंदा गरजेचे आहे. सोशल मीडिया आणि तरुणाई यावर आज गंभीर चर्चा आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे साधन आहे, लक्ष्य नाही. पण आज तरुण वर्ग आणि समाजातील अनेक जण तासन्तास रील्स, ट्रेंड्स, वाद-विवाद आणि व्हर्च्युअल प्रसिद्धीच्या मागे धावताना दिसतात. त्यांची ऊर्जा, वेळ आणि लक्ष या आभासी जगात अडकून बसतंय. सोशल मीडिया कौशल्यासाठी, शिक्षणासाठी, नवीन संधी शोधण्यासाठी, आणि माहितीच्या देवाणघेवाणीसाठी वापरला तर तो सोनं आहे. पण स्वतःला विसरणाऱ्या व्यसनात बदलला तर तो आपल्या भविष्याचा घात करणारा आहे. प्रत्येकाने स्वतःला प्रश्न विचारायला हवा, मी सोशल मीडियाचा वापर करतोय का, की सोशल मीडिया मला वापरतंय? नववर्षात ही जाणीव, ही मर्यादा, ही सवय बदलण्याची गरज आहे. सोशल मीडियावर स्वातंत्र्य असलं तरी त्याचा अतिरेक होतो आहे. फेक न्यूज, अफवा, द्वेषपूर्ण पोस्ट्स आणि तात्कालिक रागाच्या भरात घेतलेले निर्णय समाजाला विभागत आहेत. स्वातंत्र्य म्हणजे मन मोकळं करणे, पण विचार मोकळे करणे अधिक महत्त्वाचे आहे. सोशल मीडियावर आदर, सत्याची पडताळणी आणि मर्यादा ही स्वतःवर घेतलेली जबाबदारी असली पाहिजे. समाजातही बदल हवा आहे. सरकारवर टीका करणे योग्यच आहे, पण आपल्या स्तरावर उपाय शोधणे त्याहून महत्त्वाचे आहे. गावात पाणी प्रश्न असेल तर समिती स्थापन करा, रस्ते खराब असतील तर प्रशासनाकडे नियमित पाठपुरावा करा, शाळेसाठी मदत हवी असेल तर स्थानिक योगदानाची मोहीम उभी करा. कुणीतरी करेल या विचारातून बाहेर पडले नाही, तर बदलाची सुरुवातही होणार नाही. गेल्या वर्षी सरकारने केलेल्या चुका झाकण्याचा प्रयत्न केला, हे नागरिकांना जाणवलं. चुकांची कबुली देणे ही कमजोरी नाही; ती जबाबदारी आहे. नवीन वर्षात ही पद्धत बदलावी. नागरिक हा केवळ प्रेक्षक नाही, तो या देशाचा मालक आहे. म्हणून नागरिकांच्या प्रश्नांना उत्तर देणं, त्यांच्या हक्कांचा आदर करणे आणि प्रशासन पारदर्शक ठेवणे हे कोणत्याही सरकारचे कर्तव्य आहे. नवीन वर्षाचे स्वागत करताना फक्त शुभेच्छा पुरेशा नाहीत. बदलाची दिशा ठरवणे, हक्कांसाठी आवाज उठवणे आणि कृतीतून बदल घडवणे हेच आपले खऱ्या अर्थाने नववर्षाचे स्वागत होईल. आशा आहे की यंदाचे वर्ष आरोप-प्रत्यारोपांचे नाही, तर उत्तरांच्या शोधाचे असेल. घोषणांचे नाही, तर निर्णयांचे असेल. आणि स्वप्नांचे नाही, तर पूर्ततेचे असेल. बदलाच्या पाऊलखुणा उमटवण्यासाठी, नव्या स्वप्नांना सचोटीची दिशा देण्यासाठी आणि या देशात खरं भविष्य उभारण्यासाठी नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! ▮

९९२२९९९५८८

## वाचक पत्रे

### माणसाच्या निष्काळजीपणाचे भयावह दर्शन

नाणूस, वाळपई येथील 'जय श्रीराम अखिल गोमंतक गोसंवर्धन केंद्रात' घडलेली घटना समाजाला अंतर्मुख करणारी आहे. एका गायीच्या पोटातून तब्बल ४८ किलो ३०० ग्रॅम प्लॅस्टिक, पीव्हीसी पाईपचे तुकडे, चामड्याचा पट्टा, जुने रेनकोट, कापड, नायलॉन दोऱ्या व धातूची वायर शस्त्रक्रियेद्वारे काढण्यात आली. गोव्यातील अशा प्रकारची ही पहिलीच विक्रमी शस्त्रक्रिया मानली जात आहे.

रस्त्यावर टाकलेला कचरा, विशेषतः प्लॅस्टिकमध्ये गुंडाळलेले अन्न, गायी नकळत खातात आणि त्याचे दुष्परिणाम त्यांच्या जीवावर बेततात, याचे हे जिवंत उदाहरण आहे. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे गायीचा जीव वाचला असला, तरी मानवी निष्काळजीपणा आणि प्लॅस्टिक कचऱ्याचे वाढते संकट यावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ही घटना केवळ एका गायीपुरती मर्यादित नसून, पर्यावरण संरक्षण, कचरा व्यवस्थापन आणि मूक प्राण्यांबद्दलची आपली जबाबदारी याची जाणीव करून देणारी आहे. रस्त्यावर कचरा टाकणे थांबवणे आणि प्लॅस्टिकचा वापर कमी करणे, हाच अशा दुर्दैवी घटनांना आळा घालण्याचा खरा मार्ग आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

●● ●●

### राजकारणाचा चोथा

महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी अर्ज भरणे प्रक्रिया नुकतीच संपली. या आधी कधी नव्हे तितका तमाशा हौशी कार्यकर्त्यांकडून आपण बघतो आहोत. जवळपास सर्वच मोठ्या पक्षांमध्ये तिकीट नाकारल्यावरून तुफान राडा सुरू आहे. कुणी ए-बी फॉर्मकरिता पाठलाग करतो, कुणी पदाधिकाऱ्याला अर्वाच्च भाषेत बोलतो, कुणी पक्ष कार्यालयातच उपोषणावर बसतो तर कुणी रडतो, आत्महत्येची धमकी देतो. हा आहे आजच्या राजकारणाचा स्तर! खरं तर राजकारणाच्या माध्यमातून समाजाची, देशाची सेवा करण्याची संधी मिळते. खरंच तिकिटाची अपेक्षा असणाऱ्यांना किंवा तिकीट वाटप करणाऱ्याला याचे भान आहे? नाही, इतका उदात्त विचार तर सोडाच निवडून पारखून कुणाला तिकीट मिळते आहे?, ज्यांच्याकडे प्रचंड माया आहे, गुन्हेगारी इतिहास आहे आणि चापलुसी करण्याची क्षमता आहे हेच सध्याच्या



परिस्थितीवरून उघड होत आहे. हा प्रकार असाच सुरू राहिला तर पुढील काही निवडणुकांत तिकीट नाकारल्यास एकतर तिथेच जीव देतील किंवा पदाधिकाऱ्यांना जीवे मारतील. हा सर्व प्रपंच सेवा नव्हे मेवा खाऊन पिढ्यानं पिढ्यांसाठी माया जमाविण्याचा मार्ग दिसतो. कुठल्याच पक्षांकडे यासाठी मार्गदर्शक तत्त्वे नाहीत, प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकऱ्यांना न्याय देण्याची योजना नाही. होय, जनतेला मतदानातून निवडण्याचा अधिकार आहे पण एकंदरीत निवडणूक प्रक्रियाच संशयाच्या भोवऱ्यात आहे. सामान्य जनतेचा आता विश्वासच राहिला नाही. नुसताच धिंगाणा सुरू आहे आपल्या महाराष्ट्रात. ये कहाँ आ गये हम... काय म्हणावे?

**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

●● ●●

### इंग्रजी नववर्ष बदल, कॅलेंडरचा की माणसाचा

इंग्रजी नववर्षाचे आगमन होताच शहरापासून ग्रामीण भागापर्यंत जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. आतषबाजी, शुभेच्छा, सोशल मीडियावर संदेशांची रेलचेल दिसून आली. मात्र या उत्सवामागे एक प्रश्न उपस्थित होत आहे इंग्रजी नववर्षात खरंच काही नवीन बदल होतो का?

नववर्षाच्या पहिल्याच दिवशी अनेक नागरिकांकडून नवीन संकल्प जाहीर केले जातात. आरोग्य, शिक्षण, वेळेचे नियोजन, कुटुंबाला अधिक वेळ देण्याचे संकल्प घेतले जातात. मात्र काही दिवसांतच हे संकल्प विसरले जात असल्याचे चित्र नेहमीच दिसून येते. नववर्ष हा केवळ कॅलेंडरवरील बदल असून तो स्वतःहून कोणताही सामाजिक किंवा वैयक्तिक बदल घडवत नाही. शेतकरी, कामगार, बेरोजगार युवक तसेच सामान्य नागरिकांचे प्रश्न नववर्षाच्या आगमनाने आपोआप सुटत नाहीत. बदल घडण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि जबाबदार कृती आवश्यक आहे. काही नागरिक नववर्षाकडे सकारात्मक संधी म्हणून पाहत आहेत. मागील चुका सुधारण्याचा, जीवनशैलीत सुधारणा करण्याचा आणि समाजासाठी उपयुक्त उपक्रम राबवण्याचा निर्धार अनेकांनी व्यक्त केला आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, नववर्षाचा खरा अर्थ केवळ उत्सव साजरा करण्यात नसून, विचार, वर्तन आणि जबाबदारीत सकारात्मक बदल घडवण्यात आहे. नववर्षात जर संवेदनशीलता, प्रामाणिकपणा आणि माणुसकी वाढली, तरच तो बदल खरा ठरेल. एकूणच इंग्रजी नववर्षात बदल होतो तो कॅलेंडरवर मात्र खरा बदल माणसाच्या विचारात आणि कृतीत झाला, तरच नववर्षाला खरा अर्थ प्राप्त होतो. ▮

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### एक संवाद विद्यार्थीनींशी' उपक्रमातून मुलींना आत्मविश्वासाचे बळ

**मानवत / प्रतिनिधी** - मुली व विद्यार्थिनी सुरक्षित, निर्भय व आत्मविश्वासपूर्ण व्हाव्यात तसेच कायद्याबाबत सजग व्हाव्यात, या उद्देशाने परभणी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या संकल्पनेतून 'एक संवाद विद्यार्थिनींशी' हा विशेष जनजागृती कार्यक्रम मानवत तालुक्यात राबविण्यात आला.






हा कार्यक्रम श्रीमती शकुंतलाबाई कांचनराव कत्रूवार विद्यालय, मानवत व जिजाऊ ज्ञानतीर्थ माध्यमिक विद्यालय, केंद्र कोल्हा येथे एकाच दिवशी झाला. शेकडो विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमात शाळेत येताना-जाताना होणारा त्रास, छेडछाड, सोशल मीडियावरील गैरप्रकार, मानसिक तणाव आदी विषयांवर थेट संवाद साधण्यात आला. विद्यार्थिनींनी निर्भय राहावे, 'नाही' म्हणण्याचे धैर्य बाळगावे व संशयास्पद घटना त्वरित पोलिसांना कळवाव्यात, असे मार्गदर्शन करण्यात आले. मुलगी सक्षम झाली तर समाज सक्षम होतो, हा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास मिलिंद पोक्षे (एनजीओ, मुंबई), पोलीस निरीक्षक संदीप बोरकर यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढले.

### हमीभाव नोंदणीसाठी ३१ जानेवारीपर्यंत मुदत

**मानवत,/प्रतिनिधी-** राज्यातील सोयाबीन, मूग आणि उडीद उत्पादक शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम २०२५-२६ अंतर्गत आधारभूत किंमत (हमीभाव) खरेदी योजनेसाठी ऑनलाइन नोंदणी करण्याची मुदत आता ३१ जानेवारी २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. या निर्णयामुळे नोंदणीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद आणि जास्तीत जास्त उत्पादकांना हमीभावाचा लाभ मिळावा, या उद्देशाने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने ही मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

### एकाच रात्रीत चार गावात अवतरले शिवछत्रपतींचे पुतळे

**मानवत,/प्रतिनिधी** - तालुक्यातील केकरजवळा, नागरजवळा, उक्कळगाव व मांडेवडगाव येथे अज्ञातांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे बसविले. या प्रकारामुळे केकरजवळा येथे काही काळ तणाव निर्माण झाला होता. दरम्यान, ग्रा.पं. ने पुतळा बसवण्याचा ठराव घेतल्यानंतर तणाव निवळला.



तालुक्यातील केकरजवळा येथील मोकळ्या जागेत सोमवारी (ता. २९) सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा आणून ठेवल्याचे निदर्शनास आले. ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार रविवारी (ता. २८) रात्रीच अज्ञाताने हा पुतळा आणला होता. सोमवारी (ता. २९) कुठलीही परवानगी न घेता पुतळा उभारल्याने प्रशासनाने पुतळा अन्यत्र हलविण्याची तयारी केली. मात्र, ग्रामस्थांनी प्रखर विरोध दाखवला. पुतळा कोणी व कधी बसविला याबाबत माहिती घेण्यात येत असून, संबंधितांची चौकशी सुरू आहे. कायदा हातात घेणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल.संदीप बोरकर प्रभारी पोलिस निरीक्षक, मानवत आहे त्याच स्थितीत ठेवण्याची मागणी गावातील युवक व महिलांनी केली. पोलिस प्रशासनाकडून रात्री उशिरापर्यंत युवकांची समजूत घालण्याचे प्रयत्न सुरू होते. पोलिस प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून अतिरिक्त पोलिस कुमक मागविण्यात आली. दरम्यान अशाच पद्धतीने तालुक्यातील नागरजवळा, उक्कलगाव, मांडेवडगाव या ठिकाणीही छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यात आला आहे.
व वस्त्रोद्योग विभागाने ही मुदत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

### सेलू तालुका वकील संघाच्या अध्यक्षपदी जोशी यांची बिनविरोध निवड

**सेलू/प्रतिनिधी -** सेलू तालुका वकील संघाच्या नूतन कार्यकारणी निवडीसंदर्भात आज बुधवार ३१ डिसेंबर रोजी वकील संघ कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. ही बैठक वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. डी. आर. दळवे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. कैलास श्रीधरराव जोशी यांच्या नावाचा प्रस्ताव ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. वाईकर यांनी मांडला, तर त्यास ॲड. रामेश्वर शेवाळे यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सर्व सदस्यांनी एकमताने या प्रस्तावास मान्यता दिल्याने तालुका वकील संघ सेलूची नूतन कार्यकारणी बिनविरोध निवड करण्यात आली. निवडण्यात आलेल्या कार्यकारणीत अध्यक्षपदी ॲड. जोशी, उपाध्यक्षपदी ॲड. लक्ष्मण मगर, सचिवपदी ॲड. योगेश सूर्यवंशी, सहसचिवपदी ॲड. जयश्री नेब, कोषाध्यक्षपदी ॲड. देविदास इंगळे व ग्रंथपालपदी ॲड. जयंत डंख यांची निवड करण्यात आली आहे. कार्यकारणी निवडीसाठी घेण्यात आलेल्या ठराव सभेसाठी आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झाली नाही तर रेल्वे धावू देणार नाही - बच्चू कडू

## जिंतूरमधील भव्य शेतकरी परिषदेत सरकारवर कडाडून टीका; १ जुलैचा इशारा






**जिंतूर ,/प्रतिनिधी-** शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झाली नाही तर रेल्वे धावू देणार नाही बच्चू कडू जिंतूरमधील भव्य शेतकरी परिषदेत सरकारवर कडाडून टीका; १ जुलैचा इशारा शेतकऱ्यांची तात्काळ कर्जमुक्ती केली नाही तर १ जुलैपासून रेल्वे धावू देणार नाही, असा थेट इशारा प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी जिंतूर शहरातील दादा शरीफ चौक येथे आयोजित भव्य शेतकरी, शेतमजूर व दिव्यांग परिषदेत दिला. या परिषदेतून त्यांनी केंद्र व राज्य सरकारवर जोरदार शब्दांत टीका केली. बच्चू कडू पुढे बोलताना म्हणाले की, "आम्ही शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरलो आहोत. मात्र या लढ्यात शेतकऱ्यांनी एकजुटीने आमच्यासोबत उभे राहिले पाहिजे." पश्चिम महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये उसाला वेगवेगळा दर मिळतो, गुजरातमध्ये उसाला ४७०० रुपये दर मिळतो, तर महाराष्ट्रात उसाला कमी दर मिळतो, याकडे त्यांनी लक्ष वेधले. "गुजरातचा ऊस साखर देतो आणि महाराष्ट्राचा ऊस मीठ देतो का?" असा सवाल उपस्थित करत माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या साखर कारखान्यात उसाला २४०० रुपये दर दिला जात असतानाही शेतकरी त्यांनाच निवडून देतात, अशी टीका त्यांनी केली. भाजप सरकारने कापूस, सोयाबीन, तूर, केळी यासह कोणत्याही शेतीमालाला योग्य भाव दिला नाही, असा आरोप करत बच्चू कडू म्हणाले की, भाजप सरकारने शेतकऱ्यांचे आंदोलन वर आले नाही पाहिजे यासाठी आंदोलनावर कोट्यवधी रुपये खर्च करण्याचे ठरवले आहे. "भाजप हिंदूंना, काँग्रेस मुस्लिम व दलितांना हाताशी धरते, या राजकीय लढाईतून शेतकऱ्यांना बाहेर काढणे कठीण झाले आहे," असे म्हणत त्यांनी सरकारवर कडाडून टीका केली. या परिषदेत ऑल इंडिया पँथर सेनेचे दीपकभाई केदार यांनीही सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. "३१ जूनपर्यंत कर्जमुक्ती झाली नाही तर नागपूरचे आंदोलन ही फक्त झाकी असून पुढचे आंदोलन अधिक तीव्र असेल," असा इशारा त्यांनी दिला. चंद्रपूर जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने एक लाख रुपये कर्ज घेतले असता त्यावर तब्बल ७४ लाख रुपयांचे व्याज लावण्यात आले, त्यामुळे त्या शेतकऱ्याला मूत्रपिंड विकावे लागले, तरीही राज्याचे मुख्यमंत्री साधा ट्विट करत नाहीत, अशी संतप्त टीका त्यांनी केली. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनीही सरकारच्या धोरणांवर टीका करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. ही परिषद शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी व दिव्यांग यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आयोजित करण्यात आली होती.

या परिषदेतून येलदरी धरणातून जिंतूर तालुक्यासाठी स्वतंत्र कालवा काढण्यात यावा, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करून सातबारा कोरा करावा, करपरा-दुधना नदी तसेच तालुक्यातील ओढे-नाल्यांचे सरळीकरण, रुंदीकरण

व खोलीकरण करावे, २०२० पासून रखडलेला पीक विमा तात्काळ द्यावा, रानटी प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीवर तातडीची उपाययोजना करावी, तसेच पाटबंधारे विभागाने कालवे व चाऱ्यांची दुरुस्ती करावी, अशा अनेक मागण्या मांडण्यात आल्या. या कार्यक्रमाला प्रशांत डिक्कर, रविंद्र इंगळे, माधुरी क्षीरसागर, प्रा. प्रफुल्ल भोजने, अमृतदादा शिंदे, माणिक कदम, अच्युत रसाळ, शिवलिंग बोंधने, अशोक हाके, विनोद भोळे, विश्वंभर गोरवे, बाळासाहेब आळणे, पांडुरंग लांडगे, लिंबाजी कचरे, हनुमान आमले, हेमचंद्र शिंदे, शरद चव्हाण, भागीरथ मिरासे, माधव दाभाडे, माधव खरात, सचिन राठोड, प्रसाद गोरे, ओंकार पवार, रामप्रसाद माघाडे, माऊली निरवळ, रामकिसन घाटोळ, सोपान मोरे, रमाकांत गोरे, कृष्णा राऊत, दगडूबा वजीर, दीपक कास्टे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माणिक कदम यांनी केले. प्रास्ताविक इरशाद पाशा चांद पाशा पिंपरीकर यांनी मांडले, तर आभार सचिन राठोड यांनी मानले. दुधगाव महसूल मंडळासह जिंतूर तालुक्यातील शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिषदेचे आयोजन दुधगाव महसूल मंडळ, जिंतूर तालुका शेतकरी संघर्ष समिती यांच्या वतीने करण्यात आले होते.

## डॉ अंकुश लाड राष्ट्रवादीचे गटनेता

### नगराध्यक्ष राणी अंकुश लाड व नगरसेवक यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे भेट घेऊन दिले गटनेतेचे पत्र



**मानवत / प्रतिनिधी -** मानवत शहराच्या विकासाला गती देणारे डॉ अंकुश लाड यांचीं नगरपरिषदेच्या गट नेतेपदी एक मुखाने निवड झाल्याचे नगरध्यक्ष राणी अंकुश लाड यांचे सह नव निवरचित १६ नगरसेवकांनी जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांच्या उपस्थितीत गट नेतेपदी चे पत्र दिले.
ही प्रक्रिया संजयसिंह चव्हाण यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेविका तसेच सहकारी नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी राजेशदादा विटेकर यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष च्या नगरपरिषद गटनेत्याची निवड प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये १६० अशा एकमताने गटनेता म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर जिल्हाधिकारी, जिल्हाध्यक्ष तसेच सर्व नगरसेवकांचा सत्कार स्वीकारून आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी नगरसेवक राजकुमार खरात, नियमत खान पठाण,संजय बागड, किशोर लाड ,यांच्यासह नगरसेविका अनुराधा राजेश वासुंबे, ज्योती विष्णू आळसपुरे ,नंदिनी गणेश मोरे, द्वारका दत्ता चौधरी ,वृषाली विनोद रहाटे, मीरा मोहन लाड उपस्थित होते.

## जिंतूरच्या निराधार समितीने घेतली तहसीलदार यांची भेट




**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** राज्यमंत्री तथा पालकमंत्री सौ. मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली येथील संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष डॉ. पंडितराव दराडे, भाजपाचे तालुकाध्यक्ष गोविंदराव थिटे व समितीच्या सर्व सदस्यांनी मिळून तहसीलदार श्रीमती कच्छवे यांची सदिच्छा भेट घेतली. यादरम्यान तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत निराधार समितीचे चालू कार्य व विविध समस्या लक्षात घेऊन आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत चर्चा विनिमय करण्यात आला.

जिंतूरच्या तहसीलदार कार्यालयाच्या नूतन तहसीलदार श्रीमती कच्छवे यांचे समितीचे अध्यक्ष डॉ. पंडितराव दराडे व समितीचे सदस्य श्री गजानन चौधरी, श्री माधवराव राठोड, श्री रवी रणबावळे, अंकुश बकान यांनी स्वागत सत्कार केला. तसेच तहसीलदार श्रीमती कच्छवे यांनी डॉ. पंडितराव दराडे यांचा याप्रसंगी सत्कार केला. यानंतर संजय गांधी निराधार योजना कार्यालयात बैठक संपन्न झाली. या बैठकीत नायब तहसीलदार एस.पी. तांदळे,ए.एस.घुगे,ग्राम महसूल अधिकारी श्रीमती अवचार, एस. जी. शहादे यांनी समितीच्या चालू कार्याबद्दल माहिती सांगितली. याप्रसंगी समितीचे अध्यक्ष डॉ. पंडितराव दराडे, सदस्य गजानन चौधरी, रवी रणबावळे, माधवराव राठोड, सौ. दिपाली ठाकूर, श्री रामेश्वर पोंदाळ, श्री अंकुश बकान, श्री संतोष माने उपस्थित होते.

## पंचवीस वर्षां पासून निष्ठावंत भाजप कार्यकर्ते कुरेशी सुलतानाबी नईमोद्दीन उपनगराध्यक्षपदी नियुक्त करण्याची मागणी.

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जनता पक्षाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी गेली पंचवीस वर्षे प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या, उच्च शिक्षित व निष्ठावंत कार्यकर्त्यास उपनगर अध्यक्ष पदाची जबाबदारी द्यावी, अशी जोरदार मागणी नागरिक व भाजप कार्यकर्त्यांकडून होत आहे. माबूद कुरेशी यांनी ही मागणी पक्षश्रेष्ठींकडे मांडली असून, त्याला उपनगरातील नागरिकांसह कार्यकर्त्यांचा मोठा पाठिंबा मिळत आहे. भाजप हा शिस्तबद्ध व कार्य त्यांना संधी देणारा पक्ष असून, ज्या कार्यकर्त्यांनी कठीण काळातही पक्षाची धुरा खांद्यावर घेतली, अशा अनुभवी व निष्ठावंत कार्यकर्त्यांचा सन्मान होणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. पंचवीस वर्षांच्या प्रदीर्घ कार्यकाळात संबंधित कार्यकर्त्याने बूथ पातळीपासून शहर पातळीपर्यंत पक्षवाढीसाठी उल्लेखनीय योगदान दिले असल्याचेही सांगण्यात आले. उपनगर ागात पक्ष संघटन अधिक बळकट करण्यासाठी उच्च शिक्षित, सामाजिक जाण असलेला, सर्वसामान्यांशी थेट संवाद साधणारा अध्यक्ष आवश्यक



आहे. असा अध्यक्ष मिळाल्यास तरुणांना पक्षाकडे आकर्षित करता येईल, तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाला अधिक बळ मिळेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला. माबूद कुरेशी यांनी सांगितले की, "पक्षासाठी निस्वार्थपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना योग्य पदे मिळाल्यास कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढतो. उपनगर अध्यक्ष पदासाठी अनुभवी, निष्ठावंत व उच्च शिक्षित उमेदवाराची निवड झाल्यास भाजप संघटना अधिक सक्षम बनेल." दरम्यान, ही मागणी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांपर्यंत पोहोचवण्यात आली असून, लवकरच यावर सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

ठळक मुद्दे (चौकट)
पंचवीस वर्षे भाजपशी निष्ठावंत कार्यकर्ता
उपनगर अध्यक्षपदी उच्च शिक्षित उमेदवाराची मागणी
नागरिक व कार्यकर्त्यांचा व्यापक पाठिंबा
संघटन मजबुतीसाठी अनुभवी नेतृत्वाची गरज
पक्षश्रेष्ठींकडे मागणी सादर

## जिंतूरची 'उलटी' नदी होणार स्वच्छ; संवर्धन कामांचा शुभारंभ

**जिंतूर ,/प्रतिनिधी-** जिंतूर शहराचे वैभव मानल्या जाणाऱ्या बान (उलटी) नदीपात्रात साचलेल्या घाण, कचरा व गाळामुळे परिसरात दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. मंदिर, मस्जिद व दर्गा परिसरात भाविकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असल्याने या समस्येची दखल घेत नामदार तथा पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली दीपस्तंभ प्रतिष्ठान व नगरपरिषद जिंतूर च्या वतीने नदी संवर्धन कामांचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमाचा प्रारंभ दीपस्तंभ प्रतिष्ठानचे युवा नेते ध्रुव साकोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी नगराध्यक्ष प्रताप देशमुख, मुख्याधिकारी उमेश ढाकणे, नगरसेवक सचिन ऊर्फ मुन्ना गोरे, भाजप ग्रामीण जिल्हा सरचिटणीस डॉ पंडीत दराडे,तालुकाध्यक्ष गोविंद थिटे,शहर मंडळ अध्यक्ष विलास भंडारी, भाजप पक्षाचे सर्व नुतन नगरसेवक, भाजप पक्षाचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना युवा नेते ध्रुव दिपक साकोरे म्हणाले, "पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली नदी संवर्धनाचा हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात नदीपात्रातील साचलेला गाळ व कचरा काढून संपूर्ण पात्र स्वच्छ केले जाईल. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात पिचिंग व स्क्रिनिंगची कामे करण्यात येणार आहेत. तसेच शहरातील नाल्यांमधील सांडपाणी फिल्टर करून ते शेतीसाठी वापरण्याची व्यवस्था करण्यात येईल." नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांनी सांगितले की, "दोन जानेवारी रोजी आमची नवीन टिम नगर परिषदेचे पदभार स्वीकारल्यानंतर नामदार तथा पालकमंत्री मेघना बोर्डीकर



यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील रस्ते धूळमुक्त करणे, नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा, प्रभावी कचरा व्यवस्थापन तसेच सर्वांगीण स्वच्छतेसाठी नगरपालिकेच्या माध्यमातून नियोजनबद्ध कामे हाती घेण्यात येणार आहेत." नदी संवर्धनाच्या या उपक्रमामुळे जिंतूर शहराचा पर्यावरणीय समतोल सुधारण्यास मदत होणार असून नागरिकांच्या आरोग्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# सहकार भवनाचे उपमुख्यमंत्र्यांनी केले भूमीपूजन

## शहरातील मुख्य रस्त्यावर होणार ५ मजली इमारत





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

शहरातील मुख्य रस्त्यालगत उभारण्यात येणा-या सहकार भवन इमारतीचा भूमीपूजन सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडला. यावेळी राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

येथील जालना रोडवर ही इमारत बांधण्यात येईल यासाठी १४ कोटी ९८ लक्ष ७९ हजार रुपये निधीची मान्यता देण्यात आली आहे. तळमजला पार्कींग व त्यावर ४ मजले अशी ही भव्य इमारत असेल. इमारतीचे एकूण क्षेत्र २३०५.१९ चौरस मीटर इतके राहणार आहे.

या इमारतीमध्ये सर्व सहकार संबधित कार्यालये एकत्र येणार आहेत.आजच्या या भूमीपूजन सोहळयास जिल्हयाचे खासदार बजरंग सोनावणे, विधान परिषद सदस्य विक्रम काळे तसेच आमदार विजयसिंह पंडीत, संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतूल चव्हाण, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सतीष तोटावर, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे, विशेष लेखा परिक्षक धनंजय चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# संतती असेल चांगली तरच खऱ्या अर्थाने असते ती संपत्ती-साध्वी प्रतिभाकवरजी म.सा.

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

सुखाचे क्षण मिळतात ते पुण्याच्या उदयाने. तर पाप भोगावे लागते आपण केलेल्या कर्म बंधनाने. मात्र हे सुख उपभोगले जाते ते केवळ संपत्तीच्या आधाराने. तर ही संपत्ती कशी असावी यावर मंथन केले आज जैन आराधना प्रवचन मालेत गुंफलेल्या पाचव्या पुष्पाने.

यावर बोलताना साध्वी प्रतिभाजी म्हणाल्या, पैसा हाच सर्व काही संपत्तीचा भाग नाही. केवळ पैसा आहे म्हणून सुख लाभते असेही काही होत नाही. अमाप पैसा जवळ आहे, मात्र संतती आपल्या जवळ नाही, ती परदेशात वास्तव्याला आहे. तर आपलेपणाचे सुख आपणास लाभते काय? यासाठी त्याला आपलेपणाची, जवळीकतेची, संस्काराची गरज आहे. व ते लहानपणीच मुलांवर रुजायला हवेत. लहानपणी तो मागील तसे वागवणे त्याचे लाड कोड कौतुक करणे यातून त्याला आपले पणाची भावना राहत नाही. व तो मिळणार्या पश्चिमात्य संस्कृतीने स्वार्थाला बळी पडतो. त्यासाठी त्याच्यावर आपलेपणाच्या संस्काराची यासाठी त्याला द्यावयाच्या सुसंपत्तीला सुविचाराची आवश्यकता लागते. ज्यातून श्रद्धा बळावते आणि तो सात्विक विचाराला समर्थ बनतो. प्रेम आपलेपणा टिकवण्यासाठी एकत्रित पणाची आवश्यकता लागते म्हणूनच संतती असेल चांगली तरच संपत्ती होती ही खर्या अर्थाने आपली हे म्हणण्याची वेळ येते. आपण संपत्तीच्या जीवावर स्वयंपाक्याच्या हातून आपले अन्न शिजवतो. उदरनिर्वाहाला ते योग्य असते. मात्र त्यातून प्रेम आपलेपणाला ते मुकलेले असते त्यासाठी स्वतः केलेले अन्न जळाले तरी ते रुचकर लागते, यासाठी आपण एकत्रितपणाने परस्परावर प्रेम करावे असेही त्या म्हणाल्या.



तर प्रवचनाच्या प्रारंभी साध्वी पु.श्री सुमतीकवर म.सा. यांनी आपले विचार मांडले, त्या म्हणाल्या पश्चिमात्य संस्कृतीला आपण एवढे रुजलो की, सकाळी सुप्रभात म्हणण्या ऐवजी गुड मॉर्निंगने दिवसाची सुरुवात करतो. व तसे आचरण करतो. एक उदाहरण सांगतांना त्या म्हणाल्या, एका होतकरु मुलाला मोठ्या घरची मुलगी दिलेली असते. तिच्या लग्ननिरोप प्रसंगी तिच्या वडिलांनी माझ्या मुलीला फुलाप्रमाणे जपा हे सांगितलेले असते. त्यानुसार तो पती सकाळीच तिला तोंडावर पाणी मारून उठवत असे. आणि नंतरच गुड मॉर्निंग म्हणत असे याचा त्या गर्विष्ठ मुलाला राग येतो. व ती विचारते असे का? करता यावर तो सांगतो तुझ्याच वडिलांनी मला तुला फुला प्रमाणे जपण्याचे सांगितले आहे. म्हणून फुल कोमेजून जाऊ नये त्याची प्रसन्नता कायम असावी म्हणून त मी तुझ्या तोंडावर पाणी मारून तुला कायम प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. हे तत्व वास्तविक जीवनातही लागू पडते कारण केलेले पुण्य हे प्रज्वलित राहून प्रसन्न राहण्यासाठी त्याला वारंवार बॅटरी प्रमाणे चार्ज करावे लागते. तर ते कार्यान्वित होते त्यासाठी त्याला धर्म-गुरू- देवाची उर्जा कायम चार्ज करावी लागते. यासाठी तीन प्रकारची कुशलता अंगीकारण्याची आवश्यकता लागते पहिली ऊर्जा ही व्यवहारी कुशलता आहे, हीच धर्माच्या क्षेत्रात प्रवेश करण्याचे प्रवेशद्वार आहे. यासाठी औचित्याचे पालन करणे महत्त्वाचे ठरते. औचित्य साधने म्हणजे ज्या गोष्टीला महत्त्व असते. त्याला प्राधान्यता देणे हेच औचित्याचे वर्णन आहे. यालाच त्याची कुशलता समजावी लागते. तर दुसरी कुशलता ही धर्म कुशलता आहे. ही विधी व निषेध यावर अवलंबून असते विधी अर्थात त्या कार्याचे कार्य करण्याची तत्परता. पूजा-अर्चा, दान करून पुण्य संपादने हा ठरतो. विधीचा भाग तर ते न करता त्याला नाक मोडणे हा निषेधाचा भाग आणी हीच धर्माची कुशलता असते. तर तिसरी कुशलता ही अध्यात्म कुशलता. आपले आपण दोष ओळखून त्याला गुणात परावर्तन करणे हे धार्मिक पणाचे लक्षण मात्र त्या धर्माला आत्मसात करणे हे धार्मिकता तर त्या सद्गुणाला आत्मसात करणे हे धर्मात्म्याचे लक्षण. त्यासाठी साधू-संताचा विचार ऐकून त्याप्रमाणे त्या विचाराला आत्मसात करून धर्मात्मा व्हावे असे त्यांनी सांगितले.

# गुन्हेगारीची मुळे अज्ञानात; अभ्यासक्रमातच गुन्ह्यांसह शिक्षेच्या माहितीचा समावेश करा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

कारागृहांमध्ये वाढणारी गुन्हेगारी व बालगुन्हेगारी ही केवळ प्रवृत्ती नसून कायद्याविषयीच्या अज्ञानातून जन्माला येणारी गंभीर समस्या असल्याचा निष्कर्ष कारागृहातील प्रत्यक्ष अनुभवातून बिभीषण उर्फ शिवाजी महादेव चाटे (रा. साकुड, ता.अंबाजोगाई) यांना आला. त्याच धक्कादायक अनुभवावरून त्यांनी थेट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना एक पत्र लिहिले. त्यामध्ये इयत्ता पाचवी ते दहावीच्या शालेय अभ्यासक्रमातच गुन्हे व त्यावरील शिक्षांशी संबंधित महत्त्वाची कलमे समाविष्ट करावीत, अशी मागणी केली. जेणेकरून, किशोरवयातच कायद्याचे शिक्षण दिल्यास गुन्हेगारीला आळा बसेल, असे सांगत अल्पवयीन गुन्हेगारीसारख्या गंभीर विषयाकडे लक्ष वेधले. मात्र प्रशासन, शासन स्तरावरून दखल घेतली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

बिभीषण उर्फ शिवाजी चाटे यांनी निवेदनात म्हटले की, त्यांच्यावर दि.४ डिसेंबर २०११ रोजी एका प्रकरणातील आरोपामुळे त्यांना बीडच्या कारागृहात दाखल केले होते. सदर प्रकरणात दि.२२ ऑगस्ट २०१४ रोजी न्यायालयाच्या निकालानुसार त्यांची सुटका झाली. सन २०११ ते २०१४ या कालावधीत बीड कारागृहात असताना त्यांनी विविध आरोपांखाली दाखल झालेल्या युवकांशी संवाद साधला. यावर अनेकदा अभ्यासही केला. सुमारे ९८ टक्के आरोपींना आपण केलेल्या कृत्यामुळे कोणता गुन्हा नोंदवला जाऊ शकतो आणि त्यासाठी काय शिक्षा होऊ शकते, याची कोणतीही पूर्वकल्पना नव्हती. राग, भावनिक आवेश, अज्ञान किंवा परिस्थितीच्या दबावाखाली युवक गंभीर स्वरूपाची कृत्ये करतात आणि नंतर आयुष्यभर कारावास, सामाजिक बहिष्कार व मानसिक तणाव भोगावा लागतो, अशी वस्तुस्थिती त्यांनी मांडली आहे. कारागृहातील वास्तव अधिक चिंताजनक असल्याचे नमूद करताना चाटे यांनी सांगितले की, तरुण आरोपी मानसिकदृष्ट्या खचलेले असतात. अशा अवस्थेत ते व्यसनाधीनतेकडे वळतात. काही सराईत गुन्हेगारांकडून त्यांना आमिष दाखवून गुन्हेगारी प्रवाहात ओढले जाते.



जामिनावर सुटून बाहेर आल्यानंतरही हे युवक पुन्हा गुन्हे करतात आणि गुन्हेगारीचे दुष्टचक्र अधिक घट्ट होते. कारागृहांमध्ये सीसीटीव्ही व्यवस्था असली तरी काही अंतर्गत भागांमध्ये देखरेखीचा अभाव असून, दबाव किंवा भीतीपोटी युवकांवर होणाऱ्या अन्यायकारक व अनैसर्गिक कृत्यांची अधिकृत नोंद होत नसल्याची गंभीर बाबही त्यांनी निवेदनात मांडली. यामुळे अनेक युवक मानसिक व शारीरिकदृष्ट्या पूर्णपणे उद्ध्वस्त होतात. या पार्श्वभूमीवर, ११ ते १६ वयोगटातील मुलांना भारतीय संविधान काय करण्याची परवानगी देते आणि काय करण्यास मनाई करते, याची माहिती शालेय शिक्षणातून दिली गेली पाहिजे, असे मत चाटे यांनी व्यक्त केले आहे. तसेच, कारागृहामध्ये दबावाखाली किंवा आमिषापोटी अनैसर्गिक कृत्ये घडत नसतील, असे नाकारता येत नाही. मात्र, दुर्दैवाने कारागृह प्रशासनाकडे अशा घटनांची कोणतीही नोंद आढळून येत नाही, असेही चाटे यांनी

### कारागृहातील अनुभवावरून बिभीषण चाटे यांची थेट राष्ट्रपतींकडे मागणी

### प्रशासन, शासन स्तरावरून दखल घेतली नसल्याची व्यक्त केली खंत

सांगितले. दरम्यान, गुन्हेगारी, लैंगिक अत्याचार, महिलांवरील अन्याय, हुंडाबळी, जाच-जुलूम यांसारख्या सामाजिक समस्यांची मुळेही कायद्याविषयीच्या अज्ञानातच दडलेली असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे. निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून शैक्षणिक धोरणांमध्ये आवश्यक बदल घडवून आणावेत, जेणेकरून भावी पिढी गुन्हेगारीपासून दूर राहून सुसंस्कृत, कायदाभिमुख आणि सक्षम भारताच्या निर्मितीत सहभागी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

**न्यायव्यवस्थेचे तत्व प्रत्यक्षात उतरवायचे असल्यास शिक्षणातूनच जाणीव गरजेची**

शंभर गुन्हेगार सुटले तरी चालतील, पण एकही निरपराध शिक्षा भोगता कामा नये, हे न्यायव्यवस्थेचे तत्त्व प्रत्यक्षात उतरवायचे असेल तर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून शिक्षणातूनच कायद्याची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे, असे बिभीषण चाटे यांनी स्पष्ट केले आहे.

**निवेदनाची दखल घेतली, मात्र प्रशासनाकडून कार्यवाही शून्य**

अल्पवयीन गुन्हेगारी या गंभीर विषयाकडे बिभीषण चाटे यांनी लक्ष वेधत उपाययोजना मांडल्या. त्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या अधिकारी, संबंधित मंत्र्यांना पत्र पाठवले. त्यांना पत्राच्या पोहोच मिळाल्या, मात्र प्रशासन, शासन पातळीवर कार्यवाही शून्य दिसून आल्याची खंत बिभीषण चाटे यांनी व्यक्त केली.

# सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त शनिवारी बीडमध्ये भव्य रॅली व अभिवादन सभा

## नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आयोजकांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीमाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड यांच्या वतीने शहरात भव्य अभिवादन रॅलीचे आयोजन शनिवार, दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता करण्यात आलेले आहे.

या रॅलीचे उद्घाटन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त मा.प्रदीप भोगले, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त मा.उमेश सोनवणे तसेच समाज कल्याण कार्यालयाचे सहाय्यक संचालक मा.डी.बी. क्षीरसागर यांच्या हस्ते होणार असून नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष मा.प्रा.प्रदीप रोडे, ओबीसी परिषद महाराष्ट्र राज्य चे अध्यक्ष मा.संदीपजी उपरे, सनदी लेखापाल मा.बी.बी.जाधव, राष्ट्रीय कन्या कनिष्ठ महाविद्यालयाचे मा.प्रा.राम गायकवाड,अण्णाभाऊ साठे शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.उत्तम पवार व यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.गणेश वाघ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅलीस सुरुवात होणार असून, माळीवेस चौक, सुभाष रोड मार्गे अण्णाभाऊ साठे चौक, शिवाजी महाराज पुतळा मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे रॅलीचा समारोप होणार आहे.रॅलीच्या समारोपप्रसंगी सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे भव्य अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या अभिवादन सभेस प्रमुख अतिथी म्हणून मा. श्रीमती प्रियाराणी पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग), जिल्हा परिषद बीड, मा.नानाभाऊ हजारे साहेब, शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) बीड व मा.अजय बहीर साहेब, अधिक्षक, शिक्षण माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद बीड हे उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमात सर्व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, शालेय शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या शिक्षण, स्त्रीमुक्ती व सामाजिक समतेच्या विचारांचा जागर करण्यात येणार आहे. नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांसाठी प्रशासन थेट गावात

## हिंगणी बुद्रुक येथे मंडळस्तरीय महसूल आढावा बैठक,नागरिकांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

चौसाळा महसूल मंडळातील हिंगणी बुद्रुक येथे मंडळस्तरीय गुरुवार एक जानेवारी रोजी महसूल विभागाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती . या बैठकीत महसूल प्रशासनाने थेट गावपातळीवर उपस्थित राहून शेतकरी आणि नागरिकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा केली . शासन आपल्या दारी या संकल्पनेनुसार प्रशासनाने गावात येऊन सेवा देण्याचा आणि समस्या ऐकून घेण्याचा प्रयत्न या बैठकीतून करण्यात आला .

ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या बैठकीस शेतकरी , महिला , ज्येष्ठ नागरिक , लोकप्रतिनिधी तसेच महसूल व संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . महसूल विभागाच्या कामकाजाचा आढावा घेणे , प्रलंबित प्रकरणांवर चर्चा करणे आणि नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची ठरली .

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनांनुसार महसूल प्रशासन अधिक गतिमान , पारदर्शक आणि नागरिकाभिमुख व्हावे , यासाठी शासन स्तरावरून स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत . त्याच अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील महसूल यंत्रणेला गावपातळीवर आढावा बैठक घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत .

बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे महसूल विभागाच्या कामकाजाचा सातत्याने आढावा घेत असून , जिल्ह्यातील प्रत्येक महसूल मंडळात नागरिकांना वेळेत सेवा मिळावी , प्रकरणांचा निपटारा विलंब न होता व्हावा , यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही वेळोवेळी महसूल प्रशासनाला समाधान शिबिर स्वरूपात गावपातळीवर जाऊन काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत . या मार्गदर्शनाचे प्रतिबिंब हिंगणी बुद्रुक येथील बैठकीत स्पष्टपणे दिसून आले .

या मंडळस्तरीय आढावा बैठकीचे नेतृत्व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले . बैठकीदरम्यान त्यांनी नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नाची नोंद घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या . महसूल दाखले , जमीन नोंदी , वारसा हक्क , फेरफार , शेतीविषयक अडचणी , पीकविमा , ॲग्रीस्टॅक , ओळखपत्रे तसेच विविध शासकीय योजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली .

पाणीपुरवठा , शेती , जमिनीचे रस्ते , अतिक्रमण , महसूल दाखले आणि शासकीय सेवांबाबत नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांवर तहसीलदार शेळके यांनी नियमांची चौकट स्पष्ट करत मार्गदर्शन केले . काही प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले , तर काही बाबींमध्ये संबंधित कागदपत्रांची पूर्तता करून पुढील टप्प्यात निराकरण करण्यात येईल , अशी माहिती देण्यात आली .

या बैठकीला मंडळ अधिकारी दिनकर जायभाये , ग्राम महसूल अधिकारी शिवराम येवले , अश्विनी अनकर , निशा खांडेकर , शेख गफूर , सहाय्यक कृषी अधिकारी सचिन भालशंकर , ग्रामपंचायत अधिकारी श्री घरत उपस्थित होते . तसेच हिंगणी बुद्रुक येथील सरपंच अमोल वायसे , उपसरपंच अंकुश गोरे , मंडळातील इतर गावांतील सरपंच , उपसरपंच , स्वस्त धान्य दुकानदार यांचीही उपस्थिती होती . पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या समस्या थेट मांडल्या .

बैठकीदरम्यान शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत विविध शासकीय सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला . यावेळी प्रमाणपत्रे , विविध दाखले , श्रावण बाळ योजनेचे लाभपत्र , कुणबी दाखले , डोमेसाइल प्रमाणपत्र , फार्मर आयडी यांचे वितरण करण्यात आले . या सुविधांमुळे अनेक नागरिकांना तालुका किंवा जिल्हा स्तरावर जाण्याची गरज भासली नाही , अशी प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली .

बैठकीनंतर प्रतिक्रिया देताना एका ज्येष्ठ ग्रामस्थाने सांगितले की , महसूल विभाग थेट गावात येऊन आमचे प्रश्न ऐकत असल्यामुळे दिलासा मिळाला आहे . पूर्वी अनेक कामांसाठी वारंवार कार्यालयात जावे लागत होते , मात्र अशा आढावा बैठकीमुळे माहिती आणि मार्गदर्शन एकाच ठिकाणी मिळते .

या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्पष्ट केले की , महसूल प्रशासनाचे काम केवळ फाईल्सपुरते मर्यादित नसून , नागरिकांच्या समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि नियमांच्या चौकटीत वेळेत निराकरण करणे ही जबाबदारी आहे . मंडळस्तरीय आढावा बैठकींच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलद गतीने करण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले .बैठकीच्या शेवटी उपस्थित नागरिकांनी तहसीलदार शेळके तसेच महसूल विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे आभार मानले . हिंगणी बुद्रुक येथे झालेली ही मंडळस्तरीय महसूल आढावा बैठक प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करणारी ठरल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले .

# शिक्षक आमदार विक्रम काळे यांची श्री संत भगवानबाबा मा.वि बागपिंपळगाव शाळेस सदिच्छा भेट

## आ.विक्रम काळे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे केले कौतुक



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१ जानेवारी**

शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेस नविन वर्षाच्या प्रथम दिवशी शाळेस सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांना व सर्व शिक्षकांना शुभेच्छा देऊन शाळेतील विद्यार्थ्यांनी सजवलेले वर्ग पाहूण त्यातून प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक आलेल्या वर्गाला पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले.

श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात. यामध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानांतर्गत तसेच नवीन वर्षाचे स्वागत याचे औचित्य साधून शाळेत वर्ग सजावट ही स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेचे नवीन वर्षाचे औचित्य साधून १ जानेवारी रोजी परिक्षण करुन या स्पर्धेत प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या वर्गांना सन्मान चिन्ह देण्यात आले. यावेळी वर्गाचे परिक्षण शिक्षक आमदार विक्रम काळे, बागपिंपळगाव गावचे सरपंच रामेश्वर जगताप, माजी सरपंच जनार्दन आप्पा चितळकर शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले आदींनी करुन यामध्ये ८वी, ९वी व ५वी या वर्गाचा अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक काढून त्यांना शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. आमदार विक्रम काळे यांनी अचानक शाळेस सदिच्छा भेट देऊन शाळेतील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देऊन शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



बीड जिल्हा कारागृहात 'हेल्पर वायरमन' प्रशिक्षणाद्वारे कैदी बांधवांना मिळणार स्वयं रोजगाराची नवी दिशा. संचालक - श्री गंगाधर देशमुख. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (भारत सरकार) व दीनदयाल शोध संस्थान, जन शिक्षण संस्थान, बीड द्वारा जिल्हा कारागृहातील ६० बंदी बांधवांसाठी तीन महिने कालावधीच्या 'हेल्पर वायरमन' प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार ही योजना शेतकऱ्यांसाठी वरदान– महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## लाभार्थी शेतकऱ्यांना मंत्री बावनकुळे यांचेहस्ते धनादेशाचे वाटप, आ. तान्हाजी मुटकुळेंचे केले कौतुक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**

शेतकऱ्यांना सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी आणि जमिनीची प्रत वाढविण्याकरिता तसेच उत्पादन वाढविण्याकरिता गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार ही योजना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमलात आणली. या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठा फायदा होत असून ही योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

येथील शिवाजराव देशमुख सभागृहात गुरूवार दि १ जानेवारी रोजी महसूल मंत्री यांच्याहस्ते गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत जलेश्वर तलावाच्या गाळाचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना धनादेशाद्वारे अनुदानाचे वाटप करण्यात आले. यावेळी राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. डॉ प्रज्ञा सातव, माजी आ. रामराव वडकुते, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पोलिस अधीक्षक नीलभ रोहन आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, सरकारने वचन दिले होते की, लाडकी बहिण योजना चालूच ठेवणार आणि जोपर्यत आपले सरकार आहे तोपर्यंत ही योजना चालूच राहणार. शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन करण्यासाठी शेतात पाणी, शेतात जाण्यासाठी रस्ता आणि शेतकऱ्यांना दिवसा बारा तास वीज आवश्यक आहे. विकसित महाराष्ट्र करतांना तीन महत्वाच्या गोष्टी आम्ही करीत आहोत. पुढच्या पाच वर्षात शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पोहोचविण्यासाठी याकरिता करावयाच्या उपाययोजना सरकारने हाती घेतल्या आहेत. शेतकऱ्यांना दिवसा बारा तास वीज मिळावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सौरवाहीनी योजना आणली आहे. २०२९ पर्यंत राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीजपुरवठा करण्यात येणार आहे. एकही पैसा शेतकऱ्यांकडून न घेता मोफत विज देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. शेतकऱ्यांकडे असलेले जुनी थकीत २७ हजार कोटी रूपये माफ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. शेतकऱ्यांच्या वीज पंपाचे सर्व जूने थकीत बिल माफ करण्यात आले आहेत. तसेच देवेंद्र फडणवीस सरकार पुढील पाच वर्षे एकही रूपया बिल घेणार नाही.

**तान्हाजी मुटकुळे यशस्वी आमदार– महसूल मंत्री बावनकुळे**

आ. तान्हाजी मुटकुळे हे सभागृहात मराठवाडा आणि हिंगोली जिल्ह्यातील सामाजाच्या शेवटच्या व्यक्तीच्या कल्याणाच्या योजनासाठी ते सरकारचे लक्ष वेधतात. आ. मुटकुळे यांना शेती आणि शेतीविषयक ज्ञान असणारे आहेत. त्यामुळे त्यांच्यामार्फत आम्ही आणि सरकार शिकते. विधीमंडळातील आमदार आपल्या भागातील समाजातील प्रत्येक समस्या सरकारसमोर आणीत नाही तोपर्यंत सरकारलाही काही कळत नाही. हिंगोलीचे आ. मुटकुळे चांगल्या पध्दतीने शेतकरी आणि मतदारसंघातील प्रश्न मांडतात. धरणमुक्त गाळ आणि गाळयुक्त शिवार योजना याच माध्यमातून आली. राज्यात शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन करणारी योजना म्हणून या योजनेचा समावेश झाला आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मी महसूल मंत्री झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी मला सूचना दिली होती की, शेतकऱ्यांसाठी अशी योजना आणा की त्या योजनेमध्ये रस्ता पूर्ण मोफत मोजून मिळेल, शेतकऱ्यांना एकही पैसा भरण्याची गरज नाही, पांदन रस्त्याला क्रमांक टाकून मिळेल. त्याप्रमाणे राज्यात पांदन रस्त्याची कामे युध्दपातळीवर सुरू आहेत. या तीन गोष्टी शेतकऱ्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल आणीत आहेत. विकसित महाराष्ट्रसाठी शेतकऱ्यांचे योगदान फार मोठे आहे.

यावेळी बोलतांना त्यांनी आ. मुटकुळे आणि जिल्हाधिकारी गुप्ता यांनी पिंपळदरी तलाव गाळमुक्त केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. स्वामीत्वच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड देण्यात येणार आहेत. तसेच प्रधान मंत्री आवास योजनेंतर्गत ३० लाख घरांना मंजूरी मिळाली असून त्याचे कामही युध्दपातळीवर सुरू आहे.

यावेळी राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी योजनेसंदर्भात माहीती दिली. त्यानंतर लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्यात आले.

# हिंगोलीत पोलिस कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**



शहरातील कमलानगर भागात दोन गटात हाणामारी सुरू असल्याची कळताच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याच्या आदेशावरून पोलिस कर्मचारी आणि होमगार्ड भांडण सोडविण्यासाठी गेले असता दहा ते बारा जणांनी पोलिस कर्मचाऱ्यांवर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात पोलिस कर्मचारी गंभीर जखमी झाले असून त्यांना येथील शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी चार जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

बुधवारी मध्यरात्री दिड वाजण्याच्या सुमारास कमलानगर भागात विनोद गोरे व सुरज निरगुडे यांच्या दोन गटात वाद सुरू असून हाणामारी होत असल्याची माहीती हिंगोली शहर पोलिसांना मिळाली. या माहीतीवरून जमादार संजय डोंगरदिवे व एक होमगार्ड घटनास्थळी पोहोचले. पोलिस आल्याचे लक्षात येताच काही जणांनी पळ काढला. त्याठिकाणी दोघे गंभीर जखमी असत्याने जमादार डोंगरदिवे यांनी वाहन बोलावून त्यांना उपचारासाठी रूग्णालयात हलविले. दोन्ही गटातील वाद सोडवित असतांना १० ते १२ जणांच्या टोळक्याने डोंगरदिवे यांच्यावर हल्ला चढविला. त्यांना प्रतिकार करण्याची संधीही मिळाली नाही. त्यांच्यावर लोखंडी रॉडने डोक्यात मारण्यात आले. तसेच हातही फ्रक्चर झाला आहे. या मारहाणीत ते गंभीर जखमी झाले असून त्यांना येथील सामान्य रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.



**हिंगोली– राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे हिंगोली दौऱ्यावर आले असतांना माजी आ. डॉ प्रज्ञाताई सातव यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, ज्येष्ठ कार्यकर्ते विलास गोरे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. छाया– सुनील पाठक**


## संक्षिप्त वृत्त

### कार्यकारी अभियंता प्रदीप मुळे यांचा सत्कार



हिंगोली– जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप मुळे हे नियत वयोमानानुसार दि ३१ डिसेंबर रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने जिल्हा परिषदेतील षटकोनी सभागृहात सेवानिवृत्ती निमित्त सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ढोंबरे, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, जिल्हाध्क्ष रा.ना.कुलकर्णी, लेखाधिकारी माडे, यांच्या सह इतर विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### रडार वेहीकलचे गुप्ता यांचेहस्ते उद्घाटन



हिंगोली– येथील जिल्हाधिकारी कार्यालयात गुरूवारी रडार वेहीकलचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती. या रडार वेहीकलचा फायदा पोलिसांना चांगल्या पध्दतीने होणार आहे.

### कळमनुरी पुरवठा विभागात लाभार्थ्यांना त्रास

हिंगोली– कळमनुरी तालुक्यातील लाभार्थ्यांना जूने राशन कार्ड, चुक दुरूस्ती तसेच नाव कमी करणे किंवा टाकणे यासाठी येथील पुरवठा विभागातील दोन कर्मचारी लाभार्थ्यांना नाहक त्रास देत चकरा मारण्यास लावीत आहेत. शासनाने गोरगरीबांना मोफत राशन देण्यासाठी योजना आणली आहे परंतु या दोन कर्मचाऱ्यांचा मनमानी कारभारामुळे ग्रामीण व शहरी भागातील लाभार्थी त्रस्त झाले असून आर्थिक व्यवहार केल्याशिवाय पुरवठा विभागातील कर्मचारी लाभार्थ्यांची छोटी छोटी कामेही करीत नसल्याचे पहावयास मिळत आहे. या कर्मचाऱ्यांना राजकीय वरदहस्त असल्याचे बोलले जात असून याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून लाभार्थ्यांना न्याय द्यावा अशी मागणी होत आहे.

# डॉ प्रज्ञा सातव यांचा महसूल मंत्री बावनकुळेंच्या उपस्थितीत सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**



राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज दि १ जानेवारी गुरूवारी हिंगोली जिल्हा दौऱ्यावर आले असता येथील गणेश इन च्या सभागृहात भाजपच्या राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व महिला पदाधिकाऱ्यांनी महसूलमंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीमध्ये भव्य सत्कार केला.

माजी आ. डॉ प्रज्ञा सातव यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत मुंबई येथे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये भाजपमध्ये प्रवेश केला. डॉ प्रज्ञा सातव यांच्या प्रवेशामुळे जिल्ह्यात भाजपला चांगली ताकद मिळणार असून त्यांच्या सत्कारासाठी महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे हिंगोलीत आले होते. यावेळी हॉटेल गणेश इनच्या सभागृहात त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंत्री बावनकुळे यांनी डॉ प्रज्ञा सातव यांच्या पक्षप्रवेशाचे स्वागत करीत भाजपला जिल्ह्यात चांगली ताकद मिळाली असल्याचे नमुद केले. यावेळी राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्यासह भाजपच्या जिल्हाध्यक्षा उज्वला तांभाळे, सीमा जैस्वाल यांच्यासह सर्व महिला पदाधिकाऱ्यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, सुभाष लदनिया, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, रामराव वडकुते यांची उपस्थिती होती.

# भाजपने मेरिटच्या आधारावर उमेदवारी दिली– ना. बावनकुळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**



छत्रपती संभाजीनगरसह अनेक जिल्ह्यात महापालिका निवडणुकीच्या उमेदवारीवरून इच्छुकांनी भाजपवर गंभीर आरोप केले. यावर बोलतांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपने मेरिटच्या आधारावर महापालिका निवडणुकीत उमेदवारी दिल्याचा दावा केला आहे. तसेच बंडखोर उमेदवार लवकरच उमेदवारी मागे घेतील असा विश्वासही व्यक्त केला.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे गुरूवारी गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत शेतकऱ्यांना अनुदान वाटप कार्यक्रमासाठी हिंगोली येथे आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलतांना ते म्हणाले की, महापालिका निवडणुकीत भाजपचा विजय निश्चित होणार आहे. महापालिका निवडणुकीत उमेदवारीवरून उडालेला गोंधळ आणि बंडखोरी यावर बोलतांना निवडणुकीत एकाच पदासाठी एकालाच उमेदवारी मिळते. उमेदवारी मिळण्याची प्रत्येकालाच अपेक्षा असते. पक्षातअनेक वर्ष काम करणारा कार्यकर्ता नाराज होतोच. मात्र सर्वोत्तम काय आहे हे पाहून पक्षच निर्णय घेत असतो. यावेळी जिंकून येण्याच्या मेरिटवरच उमेदवारी देण्यात आली आहे. पक्षाच्या विचाराने प्रेरीत असलेला कार्यकर्ता बंडखोरी करीत नाही. राज्यात बंडखोरी झालेल्या ठिकाणी नाराज उमेदवारांच्या भेटी घेणार असून लवकरच ते उमेदवार अर्ज मागे घेतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, आ तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. डॉ प्रज्ञा सातव, माजी आ. रामराव वडकुते, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे आदींची उपस्थिती होती.

# कमला नगरमध्ये दोन गटात हाणामारी गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**

येथील कमला नगर भागात जुन्या भांडणाच्या कारणावरून दोन गटात बुधवारी मध्यरात्री तुंबळ हाणामारी झाली असून याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात परस्पर विरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

विनोद गोरे यांनी दिलेल्या तक्रारीत भगवान मुटकुळे, राहुल खिल्लारे, रिहान शेख, सुरज निरगुडे, रोहन भिसे, आमीन शेख, कृष्णा, जगताप यांच्यासह आणखी तीन जणांनी गोरे यांच्या घरासमोर जावून भगवान मुटकुळे याने डोक्यात दगड मारून जखमी केले तसेच इतरांनी घरासमोरील दुचाकीच तोडफोड केली तसेच थापडाबुक्यांनी मारून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर सुरज निरगुडे यांनी दिलेल्या तक्रारीत विनोद गोरे, गणेश गोरे रा कमलानगर यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ करून तू जास्त माजलास असे म्हणून लोखंडी पाईपने डौक्यात, पाठीत, मानेवर मारून जखमी केले तर शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. यावरून शहर पोलिस ठाण्यात परस्पर तक्रारीवरून गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलिस या गुन्ह्यातील आरोपीची धरपकड करीत असून यातील काहीजणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या भांडणामुळे रात्री शहरात तणाव निर्माण झाला होता.

# सामाजिक न्याय विभागाच्यावतीने घर घर संविधान, वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जानेवारी**



सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालया अंतर्गत शहरात नवीन मागासवर्गीय मुलींचे शासकिय वसतिगृह व मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागास मुलींचे शासकिय वसतिगृह या वसतिगृहात प्रत्येकी १०० विद्यार्थीनीं असे एकूण २०० विद्यार्थीनीं प्रवेशीत विद्यार्थीनी व विद्यार्थीनींचे पालक तसेच सर्व कर्मचारी यांनी घर–घर संविधान कार्यक्रम व वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्षा म्हणून सहायक आयुक्त गिता गुठ्ठे तर प्रमुख पाहुणे म्हणून विशेष अधिकारी अमोल घुगे, समाज कल्याण निरीक्षक एस.डी.घुगे, सर्व पालकांचे प्रतिनिधी म्हणून रमेश सोनटक्के, विजय पडघणे,.हरिभाऊ पोपळघट, राजु ससाने, विनोद कागणे, मोतीराम फड आदी मान्यवर उपस्थित होते. अमोल घुगे, गिता गुठ्ठे यांनी विद्यार्थ्यांना शासनाची घर–घर संविधान याचे प्रास्ताविक पर मार्गदर्शन व विद्यार्थ्यांनी वसतिगृहातील अभ्यासिकेचा लाभ घेऊन जास्तीत वेळ अभ्यास करुन आपले व आपल्या पालकांचे नाव लौकिक करणेसाठी मार्गदर्शन केले. तसेच घर–घर संविधान अमृतमहोत्सव निमित्त वसतिगृहात घेण्यात आलेल्या निबंधस्पर्धा, वकृत्व स्पर्धा, चित्रकला, रांगोळी स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय विद्यार्थीनींना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांचे हस्ते सन्मानीत करण्यात आले.

यानंतर वसतिगृहातील २०० मुलींसाठी वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यात प्रवेशित विद्यार्थीनींनी स्वागत गीत, देशभक्तीपर गीत गायन केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुलोचना ढोणे यांनी केले तर सुत्रसंचालन ऋतुजा सुरुसे व प्रिती मोरे, कु. पौर्णिमा बगाटे, पूजा इंगोले यांनी केले.



नांदेड- भारतीय जनता पार्टी निवडणूक जाहीरनाम्याचे प्रकाशन प्रदेश उपाध्यक्ष माधवराव भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खासदार अशोकराव चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछेडे,, आमदार श्रीजयाताई चव्हाण, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुक हंबर्डे, जिल्हाध्यक्ष अड. किशोर देशमुख, माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पांडे, माजी महानगराध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, दिलीप कंदकुर्ते व प्रवीण साले, जाहीरनामा प्रमुख संतोष पांडागळे यांची उपस्थिती होती. यावेळी जाहीरनाम्याच्या आतील मथळ्यासंदर्भातील चित्रफित दाखविण्यात आली.

# बिबट्या इस्लापूर परिसरात असल्याचे वन विभागाने केले मान्य

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १ जानेवारी-**

पांगरी शिवारातील बालाजी शेंडगे यांच्या शेतामध्ये बिबट्याने हरिनाचा फडशा पडल्याची घटना दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी घडली. आतापर्यंत बिबट्या या परिसरात नाही म्हणणाऱ्या वनविभागाने बिबट्याची ठसे नाल्यातील शेवाळलेल्या जागेवर दिसल्याने इस्लापूर परिसरात बिबट्या असल्याचे मान्य केलें. ट



यामुळे परिसरातील शेतामध्ये काम करण्यासाठी जाणाऱ्या महिला व पुरुषांमुळे प्रचंड भीतीचे वातावरण पाहायला मिळत आहे. एकीकडे बिबट्याची दहशत व दुसरीकडे वन्यप्राण्याची शेतावर असलेली दहशत या दोन्ही गोष्टीमुळे शेतकरी हा चिंताग्रस्त अवस्थेत असताना वन विभाग मात्र इस्लापूर परिसरामध्ये बिबट्याच नव्हता असे म्हणून आपली पाठ थोपटून घेण्यात धन्यथा मानत होता. त्यातच बिबट्याची ठसे ही वन विभागाने खात्रीलायक केल्याने बिबट्याची ठसे असल्याची खात्री पटल्याने बिबट्या हा परिसरामध्ये आहे हे वनविभागाला मान्यच करावी लागली. आता तरी कुंभकर्णी झोपेत असलेल्या वनविभाग झोपेचे सोंग दूर करेल का? व शेतकऱ्याच्या वन्य प्राण्याकडून होणाऱ्या नासाडी त्यांना नासाडी पासून मुक्त मुक्त करून पिकांना संरक्षण देईल का हाही प्रश्न या निमित्ताने शेतकरी वर्गास पडतो. इस्लापूर भागातील बिबट्याच्या दहशतीमुळे परिसरामध्ये भीतीचे वातावरण पसरले असून वनविभाग मात्र जनजागृती करण्यामध्येच मश्गुल असल्याची पहावयास मिळते. परिसरातील शेतकऱ्याला व जनतेला भयमुक्त करण्यासाठी वन विभागाने पावले उचलावी व बिबट्याचा बंदोबस्त लावावा अशा स्वरूपाची मागणी या निमित्ताने पुढे येत आहे. सदरील हरिणाचा पंचनामा पशुवैद्यकीय अधिकारी सोनटक्के यांनी केला. असल्याची माहिती वन विभागाकडून प्राप्त झाली.

## मरी पत्रकार नरेंद्र येरावार यांना राज्यस्तरीय दर्पण रत्न पुरस्कार जाहीर

**उमरी** -आंतरराष्ट्रीय नामांकन (आ य एस ओ ९००१-२०१५) प्राप्त हिंदी मराठी पत्रकार संघ द्वारा आयोजित राज्यस्तरीय दर्पणरत्न पुरस्कार २०२६ साठी उमरी येथील जेष्ठ पत्रकार नरेंद्र जगन्नाथ येरावार यांची



निवड करण्यात आली आहे. पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी पत्रकार नरेंद्र येरावार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हिंदी मराठी पत्रकार संघ व दर्पण वृत्तपत्राद्वारे सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार करण्यासाठी राज्यस्तरीय दर्पण रत्न पुरस्काराचे आयोजन करण्यात येते यामध्ये पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल नरेंद्र येरावार यांची निवड करण्यात आली आहे. पत्रकारितेच्या क्षेत्रात गेल्या ३५ वर्षापासून नरेंद्र येरावार यांचे कार्य आहे. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे राज्य प्रसिद्धीप्रमुख म्हणून मागील तीन वर्ष कार्य केले आहे. सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक, आध्यात्मिक,धार्मिक क्षेत्रात मोठा सहभाग राहिला आहे. नरेंद्र येरावार यांचा अंधारातील दिवे हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कथाकार, कीर्तनकार, प्रवचनकार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांसोबत राहून आशीर्वाद मिळवला आहे. नरेंद्र येरावार व त्यांच्या पत्नी सौ.उमा येरावार यांनी मरणोत्तर अवयवदान करण्याचा संकल्प केला असून शासनाकडे तशी नोंद केली आहे. येरावार दाम्पत्य मरणोत्तर अवयवदान करणारे आर्य वैश्य समाजातील एकमेव आहेत. अनेक वेळा रक्तदान करून विक्रम केला आहे. त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल येत्या मंगळवारी दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी मलकापूर येथील मराठा मंगल कार्यालय सदर पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## येवती पब्लिक स्कूल येथे विद्यार्थ्यांनी केला नवीन वर्ष साजरा !

**मुखेड-** नुतन वर्ष २०२६ च्या शुभ मुहूर्तावर परम पूज्य श्री सद्गुरू नराशाम महाराज पब्लिक स्कूल येवती येथे आज विद्यार्थी व शिक्षकांच्या हस्ते केक कापून नवीन वर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या आहेत .



यावेळी सद्गुरू नराशाम महाराज पब्लिक स्कूल येथे रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या सुंदर रांगोळ्याची पालकांच्या हस्ते निवड करुन रांगोळ्यांना प्रथम द्वितीय व तृतीय असे पारितोषिक वितरण करण्यात येणार असुन आहे . सद्गुरू नराशाम महाराज पब्लिक स्कूल येवती येथे नेहमी वाढदिवस विविध महा पुरुषांच्या जयंत्या व विविध सामाजिक उपक्रम राबविले जाते . असाच कार्यक्रम नवीन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करुन केक कापून नवीन वर्ष साजरा करणयात यावेळी पब्लिक स्कूलचे संचालक आनंदराव राठोड सर सह शिक्षक शिक्षीका शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# रस्ते सुरक्षितता अभियान हे केवळ एक महिना नसुन कायम वर्षभर राबवावे: संकेत दिघे

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १ जानेवारी-**

हदगांव आगारात महाराष्ट्र राज्य मार्ग परीवहन महामंडळ कडून रस्ते सुरक्षितता मोहीम चे उद्घाटन पोलीस निरीक्षक संकेत दिघे पोलिस स्टेशन हदगांव यांच्या हस्ते संपन्न झाले.

उद्घाटन प्रसंगी रा.प. याचे पाया हे यांत्रिक कर्मचारी असुन त्यांनी वाहनाची योग्य देखभाल केल्यास व वाहन दोषमुक्त ठेवून कर्तव्यावर जाणाच्या चालकास दिल्यास चालकांची मानसिकता चांगली होवुन ते समाधानपुर्वक कर्तव्य पुर्ण करतात. चालक वाहकांना कर्तव्यात अनेक प्रकारच्या संकटाना सामोरे जावे लागते त्या संकटावर मात करुन कर्तव्याची जाणीव ठेवुन आपले कर्तव्य पार पाडतात. वाहतुकीचे सर्व नियमांचे पालन करुन आपले वाहन सुरक्षित राहील याची दक्षता घेण्यासंबधी मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या विनोदी शैलीत खेळीमेळीच्या वातावरणात सुरक्षिततेविषयी मार्गदर्शन केले.

वाहकांना वाहनातील सर्व प्रवाशी व त्यांच्या कुंटुबाचे भवितव्या अवलंबुन असुन प्रवाशांनी गंतव्य स्थळापर्यंत





सुरक्षित पोहचविण्याचे उत्कृष्ट कार्य केवळ रा. प. महामंडळाचे चालकाच करु शकतात अशा शब्दात गौरव करण्यात आले. तसेच ते हदगांव पोलिस स्टेशन येथे रुजु झालेपासून मागील ०८ महिन्यात एक ही एस. टी. चा अपघात झाला नाही त्याबददल चालक, वाहक, यांत्रिक कर्मचाऱ्याचे अभिनंदन केले.

याप्रसंगी अध्यक्षीय समारोपात रा. प. हदगांव आगाराचे विष्णु हरकळ यांनी दि.०१.०९.२०२६ ते दि.३१.०१.२०२६ या कालावधीत सुरक्षितता अभियान राबविण्यात येणाऱ्या सूचनांचे अवगत केले . सदर कालावधीत रा. प. हदगांव आगारातर्फे प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरील विश्वविद्यालय यांचे मार्फत रस्ते मोटार वाहन अपघात व सुरक्षितता तसेच व्यसनमुक्तता याबाबत जनजागृती साठी कार्यक्रम आयोजीत करण्यात येणार आहे. तसेच चालक वाहकांसाठी आरोग्य तपासणी वैदयकीय शिबीर आयोजीत करण्यात येणार आहेत. तसेच सुरक्षिततेबाबत तज्ञाकडुन मार्गदर्शनपर कार्यकम आयोजीत करण्यात येणार आहेत. असे सांगण्यात आले आहेत.सदर प्रसंगी मोठ्याप्रमाणात चालक वाहक यांत्रिक व प्रशासकीय कर्मवारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शनदिपक मुरोशे यांनी केले.

# नरसीतील कै.सुभाष पेरकेवार कुटूंबियांना खासदार रविंद्र चव्हाणांचा दिलासा

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १ जानेवारी-**



नायगांव तालुक्यातील नरसी येथील पत्रकार तथा अल्पभूधारक शेतकरी कै. सुभाष पेरकेवार यांच्या दुःखद निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. सततच्या शेतीतील अडचणींमुळे आलेल्या नैराश्यातून त्यांनी जीवन संपविल्याची घटना नुकतीच घडली होती. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे खासदार रविंद्र चव्हाण यांनी दि.३१ डिसेंबर रोजीनरसी येथे भेट देत कै. पेरकेवार यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.

खा. रविंद्र चव्हाण यांनी कै.सुभाष पेरकेवार यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली व त्यांच्या पत्नी व कुटुंबीयांना धीर दिला.शासनाकडून मिळू शकणारी सर्वतोपरी मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.तसेचकै.पेरकेवार यांच्या मुलीच्या भवितव्याची जबाबदारी स्वीकारत,आपल्या शैक्षणिक संस्थेतील विविध शाखांमध्ये तिच्या उच्च शिक्षणाची संपूर्ण व्यवस्था केली जाईल, अशी ठाम हमी खा. चव्हाण यांनी दिली.

कै. सुभाष पेरकेवार यांच्या अंत्यविधीच्या वेळी बाहेरगावी असल्यामुळे उपस्थित राहताआले नव्हते, त्यामुळेच ही सांत्वनपर भेट दिल्याचे खा. चव्हाण यांनी स्पष्ट केले. या भेटीमुळे पेरकेवार कुटुंबीयांना मोठा मानसिक आधार मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

या सांत्वन भेटी प्रसंगी नाम फाऊंडेशनचे भा.ग.मोरे, काँग्रेसचे पदाधिकारी सुरेश जाधव,एन एस यु आय चे सुरज शिंदे, अनिल कांबळे, सामाजिक कार्यकर्ते लालबाजी सूर्यवंशी,मारोती सूर्यवंशी,तालुका मराठी पत्रकार संघाचे माजी.अध्यक्ष सय्यद जाफर भाई, आनंदराव सूर्यवंशी, भगवान पेरकेवार यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ व पेरकेवार कुटुंबिय मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते

# आंतरराष्ट्रीय धम्मध्वज दिनानिमित्त ८ जानेवारी रोजी महाधम्मध्वज महापदयात्रा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ जानेवारी-**

८ जानेवारी हा 'विश्व बौद्ध धम्म ध्वज दिन' म्हणून जगभरात साजरा केला जातो. बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसारासाठी संपूर्ण जगातील बौद्धांचे एकच प्रतिक असावे यासाठी सन १८८० मध्ये श्रीलंकेचे अनागरिक देवमित्त धम्मपाल, महास्थवीर गुणानंद सुमंगल, बौद्ध विद्वान जी. आर. डिसिल्वा इत्यादींनी मिळून निळा, पिवळा, लाल, पांढरा व केशरी अशा पाच रंगाच्या उभ्या व आडव्या पट्ट्यामध्ये 'विश्व बौद्ध धम्म ध्वजाची' निर्मिती केली. हा ध्वज जगातील सर्व देशांतील विद्वान विचारवंत आणि महान भिख्खू संघाने स्वीकार केला. विश्व बुद्ध धम्म ध्वज दिन समस्त भारतीय बौद्धांचा सण, उत्सव, सोहळा व्हावा तसेच या दिवशी बौद्धांनी मोठ्या प्रमाणावर एकत्र यावे यासाठी शहरात ८ जानेवारी २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय धम्मध्वज दिनानिमित्त सकाळी ७ वाजेपासून अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरु संघनायक भदंत पंयाबोधी थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत महाधम्मध्वज महापदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने खुरगाव येथून शहरातील रेल्वे स्टेशननजिकच्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत १४६ फुटांच्या महाधम्मध्वज महापदयात्रेचे आयोजन करण्यात आले असून खुरगाव, पासदगाव, नेरली फाटा, भावसार चौक, तरोडा नाका, राज कॉर्नर, आयटीआय कॉर्नर,भ. बुद्ध पुतळ्याची नियोजित जागा, फुले स्मारक, शिवाजी नगर, कला मंदिर या मार्गाने जाऊन पदयात्रेचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळच होणार असल्याची माहिती प्रशिक्षण केंद्राचे संचालक, अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी दिली.

**जाहीर प्रगटन**

तहसीलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायलयात
इ.कि.फौ.अर्ज.क्र./२०२५
श्री.माधव बापुराव निलेवाड
विरुध्द
ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हातणी ता.उमरी जि.नांदेड.
प्रकरण - जन्म नोंद घेणे बाबत.

व्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे माधव बापुराव निलेवाड रा. हातणी ता. उमरी जि. नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म/ मृत्यू नोंदणी कायदा २०२३ व सुधारीत शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ अन्वये दिनांक १५/०७/२०२५ रोजी नोंद घेण्यासाठी इ.कि. फौ. अर्ज दि. // रोजी दाखल केला आहे.

अर्जदार यांचा मुलगी नामे सानीका माधव निलेवाड यांचा जन्म दिनांक २६/०९/२०१९ रोजी झाल्याची नोंद मौ. हातणी ता.उमरी जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची/मृत्युची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून १५ दिवसाच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणा-या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही १५ दिवसात आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतफी आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक ३०/१२/२०२५
स्थळ - उमरी

**तहसीलदार उमरी**

# श्री परमेश्वर देवस्थान महाशिवरात्री यात्रा नियोजन बैठक उत्साहात

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १ जानेवारी-**



हिमायतनगर येथील श्री परमेश्वर देवस्थानच्या २०२६ च्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवाच्या नियोजनासाठी दिनांक ०१ जानेवारी, गुरुवारी दुपारी २ वाजता मंदिर सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात मंदिराचे उपाध्यक्ष महावीरचंद श्रीश्रीमाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ शेतकरी विठ्ठलराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत यात्रा सब कमिटीच्या अध्यक्षपदी सुभाष शिंदे, उपाध्यक्षपदी विठ्ठलराव चव्हाण व विठ्ठल ठाकरे, तर सचिवपदी अनिल भोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावर्षीची महाशिवरात्री यात्रा दि.१३ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणार असून दि.०१ मार्च २०२६ रोजी सत्कार सोहळ्याने समारोप करण्यात येणार आहे. यात्रा काळात भाविक-भक्त, व्यापारी, कलावंत, खेळाडू, भजनी मंडळ व यात्रेकरूंना येणाऱ्या अडचणी, तसेच भव्य शंकरपट स्पर्धा व इतर कार्यक्रमांचे नियोजन यावर सखोल चर्चा करण्यात आली.

सप्ताह काळात ज्ञानेश्वरी व वीणा पारायण, काकडा आरती, हरिपाठ, अखंड हरिनाम, किर्तन, प्रवचने असे भव्य धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. त्यानंतर धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा व शेतकरी वर्गासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कबड्डी स्पर्धा, भव्य कुस्त्यांची दंगल, भजन, शंकरपट, पशुप्रदर्शन, महिला व मनोरंजनात्मक स्पर्धांचा समावेश राहणार आहे.

यात्रेत यशस्वी ठरणाऱ्या संघ, खेळाडू, शालेय स्पर्धा विजेते व सहभागींस बक्षिसे व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विविध उपसमित्या नेमण्यात आल्या असून जबाबदाऱ्या संबंधित पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आल्या आहेत. तसेच भाविकांच्या सोयी-सुविधा, दर्शन व्यवस्था, महाप्रसाद वितरण व सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष नियोजन करण्यात आले असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

यावेळी विठ्ठलराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न मंदिर कमेटी उपाध्यक्ष महावीरसेठ श्रीश्रीमाळ, सेक्रेटरी अनंता देवकते, संचालक राजाराम झरेवाड, वामनराव बनसोडे, ॲड दिलीप राठोड, मथुराबाई भोयर, अनिल मदसवार, संजय माने, विलास वानखेडे, गजानन मुत्तलवाड, नगराध्यक्ष रफिक सेठ, नगरसेवक विठ्ठल ठाकरे, गजानन गुंडेवार, सुभाष बल्पेलवाड, सरदार खान, भारत डाके, झिशान मिरझा, कलीम अब्दुल सलाम, फेरोज खान पठाण, शेख इलियास शेख कलाम, मेंडके, माजी जी. प. सदस्य समद खान, माजी नगराध्यक्ष कुणाल राठोड, माजी नगराध्यक्ष अखिल भाई, यात्रा कमेटी उपाध्यक्ष सुभाष शिंदे, रामराव सूर्यवंशी, गणेश शिंदे, मायंबा होळकर, संतोष गाजेवार, ज्ञानेश्वर शिंदे, श्याम पाटील, बाबुराव पालवे, प्रवीण कोमावार, राम नरवाडे, शिवसेना शहरप्रमुख प्रकाश रामदिनवार, शिवसेना शहराध्यक्ष गजानन हार्डफकर,

तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट तालुकाध्यक्ष वामनराव मीराशे पाटील, पांडुरंग तुपतेवार,भाऊराव वानखेडे, भाजपा तालुकाध्यक्ष गजानन चायल, उदय देशपांडे, रामभाऊ सूर्यवंशी, मारोती हेंद्रे, संतोष वानखेडे, संतोष मुद्देवाड, तुकाराम मेरगेवाड, पंडित ढोणे, प्रवीण मामीडवार, गोविंद शिंदे, अमोल धुमाळे, सितू सेवनकर, विकास नरवाडे, निकु ठाकूर, विपुल दंडेवाड, पापा पार्डीकर, साहेबराव चव्हाण, श्याम जक्कलवाड, बंडू अनगुलवार, सतीश सोमसेटवार, साहेबराव अष्टकर, रामेश्वर पेटपल्लेवार, विशाल जाधव, बालाजी ढोणे, गोपीनाथ डोईफोडे, पवन गुंडेवार,लिपिक बाबुराव भोयर गुरुजी, जेष्ठ पत्रकार परमेश्वर गोपतवाड अशोक अनगूलवार, मनोज पाटील, असद मौलाना, मन्नान भाई, नागेश शिंदे, परमेश्वर काळे, देवानंद गुंडेकर, सुभाष गुंडेकर, अनिल नाईक, आदिसह शहरातील नागरिक, युवक मोठया संख्येने उपस्थित होते.

**हदगांव नगर परिषद हदगांव**

**ता. हदगाव जि. नांदेड**

**०२४६८ ऑफिस २२२४०८**

Email-id-cohadgaongmail.com | **स्थापना १९५४**

ह.न.प.जा.क्र.न.प.सा.नि./४९९६/२०२५ | दिनांक०१/०१/२०२६

**जाहिर निविदा प्रसिध्दीकरण**

हदगाव नगर परिषद कार्यालया तर्फे हदगाव शहरातील भटक्या (श्वानांचा) कुत्र्यांचा बंदोबस्त करणे व त्यांना पकडुन निर्बिजीकरण (नसबंदी) करणे आवश्यक असल्याने न.प.च्या उपलब्ध निधीमधुन दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पुरवठा धारकांनी सदर कामाचे दरपत्रक सिलबंद पाकीटामध्ये मागविण्यात येत आहेत. बंद निविदा दिनांक- ०९/०१/२०२६ रोजी दुपारी २.०० बाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात मुदतीत सादर करणेत याव्यात.

| अ.क्र | कामाचा तपशील | टेंडर फॉर्म रक्कम | टेंडर अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | हदगाव शहरातील भटक्या (श्वानांचा) कुत्र्यांचा बंदोबस्त करुन निर्बिजीकरण (नसबंदी) करणे करिता प्रति श्वान पकडणे व निर्बिजीकरण करुन श्वान बरे होईपर्यंत औषध उपचार व देखभाल करणे | १०००/- रुपये | ५०००/- रुपये |

भारतीय जीवजंतु कल्याण मंडळ (WBI) यांनी निर्देशित केल्यानुसार नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. निविदे सोबत जोडावयाची कागदपत्रे.

१. (WBI) संस्था नोंदणी प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रे.

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद हदगाव**